दिवालीकी रात

~~हि— पियारी~~ जग

([illegible])

# दिपवाळी रंजन.

अर्थात

## दिवाळीसंबंधीं उपयुक्त माहितीचें पुस्तक.

प्रसिद्ध करणार

**नारायण गोविंद काळकर.**

हें पुस्तक मुंबईत,

गोरक्षण प्रिन्टिंग प्रेसमध्यें छापिलें.

( ह्या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क मालकानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.)

शके १८२५—सन १९०३.

किंमत १२ आणे.

## अनुक्रमणिका.


विषय. पृष्ठ

१ उद्देश व स्वरुप........................................ १

२ दिवाळीची उत्पत्ती, विधर्मी लोकांच्या आक्षेपांचें खंडण व दिवाळीच्या दिवसांत करावयाचीं धर्मकृत्यें........ ६

## दिवाळीच्या कथा.

३ नरकचतुर्दशीची कथा ........................................३०

४ दिवाळीची कथा........................................४०

५ भाउबीजेची ( यमद्वितीयेची ) कथा........................४९

६ अभ्यंग स्नानविधि ( उटणीं वगैरे करण्याची माहिती )....५१

७ मिष्टान्न भोजनक्रिया (नानाप्रकारचीं पक्कान्नें क. मा. )....५६

८ अग्निक्रीडा ( रंगी बेरंगी दारू कामाची माहिती )....७१

९ रंगवल्लीक्रिया ( रांगोळ्या काढण्याची माहिती )........८७

१० उपसंहार ( दिवाळीच्या सणाची उपयुक्तता)............९१

रांगोळ्यांच्या आकृति........................................९३

होतें.
त्र

॥ श्री ॥

# दिपवाळी रंजन.

प्रकरण १ लें

## उद्देश व स्वरूप.

बांधवहो, गेल्यावर्षी दिवाळीच्या दिवसांत एके दिवशीं मी सहज समुद्राकिनाऱ्यावर सहल करण्याकरितां गेलों असतां तेथें दोन तीन मिशनरी ( उपदेशक ) आपल्या ( त्यांच्या ) धर्मप्रसार करण्याच्या ठरविलेल्या युक्तिप्रमाणें " हिंदुलोकांच्या सणांविषयीं निबंध " ह्या नांवाचें पुस्तक हातांत घेऊन उपदेश करित उभे राहिले होते, आणि त्यांच्या सभोंवतीं आपणांतील कित्येक धर्मानभिज्ञ ( कुळंबी, माळी इ० ) लोक जमले होते व कित्येक त्यांचा उपदेश ऐकून त्याविषयीं आपसांत तर्क कुतर्कांची वाटाघाट करीत होते. इतक्यांत त्यांचा तो जमाव माझ्या दृष्टीस पडला आणि " काय आहे ते पहावें " असें मनांत आणून मीही त्यांच्यांत जाऊन उभा राहिलों व मिशनरींचा उपदेश ऐकूं लागलों, तों त्यांनीं आपल्या ( हिंदुलोकांच्या ) आनंदाच्या मोठ्या सणांवरच हत्यार

होतें आणि तो सर्वथैव खोटा असून केवळ अज्ञान लोकांनींच उपस्थित केलेला आहे इत्यादि प्रतिपादन करीत होते. मी तेथें गेल्यानंतर त्यांनीं जीं भाषणें केलीं, तीं वर सांगितलेल्या निबंधांत लिहिलेलीं होतीं. तो निबंध आमच्या प्रिय वाचकांस पाहण्याची आम्हीं शिफारस करितों कारण आम्ही आपला हा निबंध त्यांच्या लेखाच्या खंडनार्थ मुद्दाम लिहिला आहे.

मित्रहो, वर लिहिलेल्या सणांविषयींच्या निबंधांतील सर्वच विचार खोटे, अग्राह्य आणि अयोग्य आहेत, असें माझें म्हणणें नाहीं, पण दिवाळीच्या सणामुळें "सदाचरण व नीति यांस भ्रष्टत्व प्राप्त होतें" हें त्या ख्रिस्त्यांचें बोलणें व लिहिणें, किती निराधार व अप्रयोजकपणाचें आहे बरें! ज्यांस आमच्या धर्माचीं तत्त्वें पुरतीं माहित नाहींत, त्यांस आमच्या धर्मावर, सणांवर आणि गृहकृत्यांवर निबंध लिहावेसे वाटतात मग त्यांजकडून यथातथ्य विवेचन कसें होईल! तथ्यविवेचन बाजूला राहून अशा धर्मद्वेष्ट्यांकडून होणाऱ्या चर्चेंत आमच्या धर्माची, रीतिभातीची आणि एकंदर कृतीची निर्भत्सना मात्र होणार आहे, यांत संशय नाहीं. आमच्या अनादिधर्माचीच जर निंदा होते, तर त्याच्या सणांस विचारतो कोण?

दिवाळी मुळें सदाचरण व नीति यांस भ्रष्टत्व प्राप्त होतें. आणि नाताळांत किंवा एप्रिलच्या पहिल्या तारखेस मात्र नीति वाटते नां? असो तूर्त आमच्या सर्व प्रकारांवर काल-चक्रच फिरूं लागलें आहे. ह्मणून अधिक बोलणें हितावह नव्हे तरी या ठिकाणीं इतकें सांगणें भाग आहे कीं, आमच्या दिवाळीच्या सणांत सदाचरण व नीति यांस भ्रष्टता प्राप्त न होतां कांहीं अंशीं त्यांस पुष्टताच येते; असें या दीपवाळीरंजनांत प्रवेश करतांच प्रत्येक सुजनाच्या ध्यानांत येईल.

सुजनहो, पाद्रीलोक केवळ सणांवरील निबंध वाचून स्वस्थ राहिले नाहींत, ते आमच्या धर्माची व सणांची निंदा सुमारें ५॥ वाजेपर्यंत करून निघुन गेले. नंतर मी व मजपाशीं उभे राहिलेले चार पांच मराठे समुद्रकांठावर जाऊन बसलों. नंतर त्यांतील एक बोलूं लागला "एहा बरें, हे पाद्री लोक होते ह्मणून आज आपल्याला या दिवाळीच्या सणाविषयीं थोडी बहुत माहिती मिळाली व या सणांत कोणतें कृत्य करणें योग्य व कोणतें अयोग्य आहे? हेंही समजलें नाहीं तर आमचे उपाध्येबोवा! लक्ष्मीपूजन आज सात वाजतां करावयाचें बरें! असें सांगून जातील व संध्याकाळीं येऊन कांहीं तरी बडबडून दक्षणा उपटतील!!" अशीं त्यांची भाषणें ऐकून मल

एके अर्थी हंसूं आलें व तें ह्मणणें कांहींअंशीं खरेंही वाट- ल्यामुळें वाईट वाटलें. तेव्हां जरी त्या लोकांची व माझी पहिली ओळख नव्हती, तरी मी त्यांजपाशीं बोलूं लागलों. पण हें काय माझें ऐकतो ? खरोखरच आमच्यांत ज्यांस धर्माधर्म समजविण्याचा अधिकार आहे; ते आह्मांस योग्य रीतिनें धर्माची समजुत देत नाहींत, मग सणांविषयीं तरी कोण सांगतो ? शेवटीं त्या लोकाचें व माझें बोलणें होतां होतां असें ठरलें कीं, ज्याप्रमाणें पाद्री लोकांनीं आपल्या ( आमच्या ) प्रत्येक सणांविषयीं निबंध लिहिले आहेत, त्याप्रमाणें या दिवाळीच्या सणाबद्दल सर्व माहितीचा पहिला निबंध लिहून तयार करावा. त्या ठरावाप्रमाणें हा निबंध लिहून सुजनांच्या पुढें ठेविला आहे. यांतील माझे सर्वच विचार सर्वांस आवडतील आणि ते विद्वन्मान्य होतील, असें जरी नाहीं; तरी या सणाविषयींची चर्चा या योगानें सुरू होईल व खरा प्रकार सर्वांस माहित होईल, अशी पूर्ण खातरी आहे.

या निबंधाचे पांच भाग केले आहेत. पहिल्या भागांत दिवाळीचा सण कोणकोणत्या कारणांनीं उत्पन्न झाला, याविषयीं विवेचन असून दिवाळीचे दिवसांत कोणकोणतीं कर्में अवश्य करावी ? याबद्दल शास्त्रसिद्ध माहिती दिली आहे.

दुसऱ्यांत दिवाळीच्या प्रत्येक दिवसाबद्दल पुरातन कथा सांगितल्या आहेत. तितक्यांत अभ्यंग स्नानविधि, म्हणजे अनेक प्रकारचीं उटणीं, सुगंधीक तेलें इत्यादि कशीं करावीं, हें सांगितलें आहे. चवथ्यांत नानाप्रकारच्या पक्वान्नांची माहिती व कृति सांगितली आहे. आणि पांचव्यांत अग्निक्रीडा (दारूकाम) कशी करावी, हें सांगितलें आहे.

आमचा प्रत्येक सण पारमार्थिक, शारीरिक आणि मानसिक अशा तीन तीन प्रकारांनीं उपयुक्त आहे. तो असा कीं, कोणत्याही सणांत देवतेची उपासना दान, धर्म इत्यादि अवश्य असल्यामुळें सहजावृत्त्याच हौसेनें ईश्वराची आराधना होते. हा पारमार्थिक उपयोग सहज व उघड आहे. कांहीं तरी खेळ खेळण्याचाही रूढिमार्ग आहे; त्यामुळें शारीरोपयोग होतो आणि त्यांत मनोरंजक प्रकार अनेक असल्यामुळें मन उल्हासयुक्त होतें आणि उमेदीनें कर्तव्यकर्म करण्याविषयीं प्रेरणा करितें. पुढील निबंधांत हे प्रकार उघड करून दाखविले आहेत, ते वाचून त्यांचा विचार करणें प्रत्येक सुजनाचें कर्तव्यकर्म आहे.

आतां विश्वव्यापक परमात्म्याजवळ इतकीच प्रार्थना करितों कीं, आमचें हें कृत्य महाजनांस ग्राह्य व त्यांच्या सेवेस पात्र होवो.

# दिवाळी.

दीप आणि आवलि—या दोन शब्दांचा संस्कृत भाषेच्या नियमाप्रमाणें षष्ठीतत्पुरुष समास होऊन "दीपावलि" हा शब्द उत्पन्न झाला. नंतर त्याचा अपभ्रंश होऊन तो मराठी भाषेंत "दिवाळी" असें रूप पावला. दीपावलि ह्मणजे दिव्यांच्या ओळी, पंगति किंवा रांगा या सणांत पुष्कळ दिवे लावण्याची चाल असल्यामुळें याला हें नांव मिळालें आहे. परंतु या सणांत अधिक दिवे कां लावावे? अंगास सुवासिक तेलें लाऊन उष्णोदकानें स्नानें कां करावीं? दारू कां जाळावी? आणि हेच चार पांच दिवस सणासारखे कां मानावे? इत्यादि प्रश्नाबद्दल आपल्यांतील धर्ममतानें लोकाचारानें आणि यथार्थदृष्टीनें निरनिराळे विचार आहेत.

आश्विनमास आणि पर्जन्यकाळ, यांची समाप्ती बरोबरच होते आणि आपल्या देशांत नवें धान्य तयार होण्याचे हे दिवस आहेत. त्यामुळें पहिल्या प्रतीचा व्यापार करणारे शेतकरी लोक या दिवसांत आनंदांत असतात. शिवाय चांगला पाऊस पडून चोहोंकडे सुबत्ता झाल्यावर आबालवृद्धांस आनंद होणें साहजीक आहे.

त्याचप्रमाणें अश्विनवद्यांत जिकडे तिकडे सुकाळ झाल्याचें समजल्यावर आपणां सर्वत्रांस आनंद व्हावा आणि आपण हे आश्विनाचे तीन चार दिवस व कार्तिकारंभाचेही एक दोन दिवस आनंदांत घालवावे; हें आपलें कर्तव्यच होय. यथार्थ दृष्टीनें पाहतां आपला हा दिवाळीचा सण उत्पन्न होण्यास मुख्य कारण हेंच आहे.

दुसरें हल्लीं आपल्या इकडे शालिवाहनशक चालत आहे. परंतु फार वर्षांपूर्वीं चोहोंकडे विक्रमशकच चालत असे. त्या शकाचा वर्षारंभ कार्तिक शुद्ध प्रतिपदेस होतो; ह्मणून उदीमधंदा करणारे जे व्यापारी, आणि त्यांतही अग्रेसर असे जे नर्मदेपलीकडचे गुजराथीवाणी, भाट्ये इत्यादि, ते अजूनही विक्रमसंवतालाच मानणारे आहेत. (शास्त्रमानाप्रमाणें नर्मदेपलीकडे विक्रमशक (संवत्) चालतो) ह्मणून त्यांच्या चालत्या वर्षाची अखेर व नव्या वर्षाचा आरंभ याच दिवसांत होत असतो. त्यामुळें नेकीनें व्यापार करणारे जे आहेत, ते वर्षभर व्यापार करून जो नफा झालेला असतो, त्याचा मेळ पाहून आनंदित होतात आणि नव्या वर्षारंभामुळें नव्या व्यापाराच्या सुरवातीची ही एकप्रकारें हुरूपच असते ह्मणून उत्साह करावा असें वाटतें. ह्मणून याच दिवसांत दिवाळी हा आनंदाचा व ऐश

आरामाचा सण करणें हें रास्त दिसतें आणि हा सण उत्पन्न होण्यास दुसरें कारण व्यापारी लोकांचा आनंद हेंच आहे.

व्यापार संबंधानें व्यापाऱ्यांची चाकरी करणारे जे लोक आहेत, त्यांचा पगार सरकारी पगारासारखा महिन्याचे बोलीचा नसतो. ते लोक आपल्या नोकरांस साल्याच्या ठरावानें ठेवितात, ह्मणून साल अखेर ताळेबंद होऊन वर्षांतील व्यापाराचा नफा तोटा समजल्यावर ते नोकर लोकांचा पगार करितात. याकारणानें नोकर लोकांच्या हातींही पैसा येण्याचे हेच दिवस आहेत. हातांत पैसा दिल्यावर लहान मुलांस जरी कांहीं समजत नसतें; तरी त्यांसही आनंद होतो, मग जे सज्ञान व सुजाण असे जे नोकरलोक त्यांस आनंद कां वरें न व्हावा ? अर्थात् ज्यावेळेस व ज्या दिवसांत आनंद होईल, तेच दिवस सणाचे. या अश्विनवद्यांत चाकरी करणारांसही आनंद होण्याचें कारण योग्य आहे. ह्मणून दिवाळी हा आनंदाचा आणि धर्ममताप्रमाणें संपत्ती देणारा, विपत्ती घालविणारा आणि पुढें वर्षपर्यंत आपला काल कसा जाईल हें उघड रितीनें दाखवून देणारा असा हा सण आह्मीं व आमच्या देशबांधवांनीं याच दिवसांत करावा, हें योग्य आहे.

आतां लोकाचाराप्रमाणें दिवाळी, हा सण आमचे लोक किती दिवस मानतात आणि त्या प्रत्येक दिवशीं काय काय करतात हें सांगून पुढें शास्त्रीयरित्या या दिवसांत काय काय कर्मे करावीं आणि कोणकोणत्या प्रकारांनीं वागावें हेंही सांगूं.

या सणाचा अश्विनवद्य त्रयोदशीचे दिवशीं आरंभ होतो. या बरोबर आणखी दुसरे दोन तीन सण असतात. ते सर्व मिळून दिवाळीचे पांच दिवस मानले आहेत. त्यांत प्रत्येक दिवशीं जीं जीं कृत्यें करितात तीं अनुक्रमें येणें प्रमाणें :—

पहिल्या दिवसास धनतेरस असें नांव आहे. या दिवशीं प्रातःकाळीं गाईची पूजा करितात, व सायंकाळीं धनाची पूजा केल्यावर यमराज्याप्रीत्यर्थ दक्षणेस तोंड करून दिवा लावितात. याच दिवसापासून दिवाळींत जी आराष करायाची तिला आरंभ होतो. याच रात्रीं पहाटेस स्नाना करितां पाणी भरून ठेवितात.

दुसऱ्या दिवसाचें नांव नरकचतुर्दशी. या दिवसाच्या संबंधाची कथा पुढें दिली आहे. या दिवशीं अरुणोदयापूर्वीं मंगलस्नान करण्याची चाल आहे.

तिसरा दिवस अमावास्या, हा या सणांतील मुख्य

दिवस, या दिवशीं श्रीमान् लोक आपल्या घरीं सोन्या-नाण्याची व सावकार लोक चोपड्यांची पूजा करितात. या कृत्यास लक्ष्मीपूजन हें नांव आहे.

चवथा दिवस बलिप्रतीपदेचा याची कथा पुढें आहे. या दिवशीं घरांतील सर्व केर एके टोपलींत जमा करून त्यावर एक पैसा, दिवटी-आणि केरसुणी ठेऊन ती टोपली चाकराच्या हातांत देतात आणि थाळी वाजवून "इडा-पीडा जावो आणि बळीचें राज्य येवो" असें ह्मणून तो केर उकिर्ड्यावर नेऊन टाकवितात. नंतर बायका आंगण्यांत शेणाचा बळीराजा करून त्याची पूजा करितात.

पांचवा दिवस भाऊबिजेचा याला यमद्वितिया असें ह्मणतात. याचीही कथा पुढील भागांत दिली आहे. या दिवशीं बहिणी भावांस आपल्या घरीं बोलावून त्यांस ओं-वाळतात आणि मिष्टान्न भोजन किंवा फराळास वाढितात. याप्रमाणें दिवाळीचा सण पांच दिवसांत समाप्त होतो.

दिवाळी हा सण तर खराच पण आमच्या मतानें यांतील बहुतेक दिवस व्रताचे असल्या कारणानें दिवाळीचे दिवस सहा असावेत. याविषयीं प्रमाण धर्मसिंधुवरून:—

"अश्विन कृष्ण पक्षांतील जी द्वादशी, तिला गो-वत्सद्वादशी असें ह्मणतात. ती प्रदोष कालव्यापिनी

घ्यावी. दोन्हीं दिवशीं प्रदोष कालव्यापिनी नसेल तर दु-सऱ्या दिवसाची घ्यावी. कारण सायंकाल हा तिचा गौण-काल असून त्याकालीं तिची व्याप्ती आहे. बरें दोन्हीं दि-वस प्रदोष कालव्यापिनी असले, तर पूर्व दिवसाची घ्यावी असें कित्येक ग्रंथकार ह्मणतात. ह्या द्वादशीचे दिवशीं वत्स तुल्य वर्ण असून सवत्स आणि दूध देणारी अशा गाईचें पूजन करून तिच्या पायांवर ताम्र पात्रानें अर्घ्य द्यावें. त्या अर्घ्याचा मंत्रः—

क्षीरोदार्णव संभूते सुरासुर नमस्कृते,
सर्वदेव मयेमात गृहाणार्घ्यं नमोस्तुते.

ह्याच मंत्रानें "अर्घ्य द्यावें" तदनंतर उडीद इत्यादि धा-न्याचे वडे गाईला भक्षणार्थ देऊन प्रार्थना करावी. प्रार्थ-नेचा मंत्रः—

सर्वदेव मयेदेवि सर्वदेवै रलंकृते ॥
मातर्ममाभिलषितं सफलं कुरु नंदिनि ॥

ह्या गोवत्स द्वादशीचें दिवशीं तेलांत तळलेलें, स्थालींत शिजविलेलें, गाईचे दूध, दहीं व ताक वर्ज करावें. नक्त-व्रत, उडीद मिश्रित अन्नाचें भोजन, भूमीवर शयन आणि ब्रह्मचर्य, हे नियम पाळावे. ह्याच द्वादशीला आरंभ करून पांच दिवसपर्यंत पूर्व रात्रीं नीरांजन विधि करावा असें

नारद सांगतात. " देव, ब्राह्मण, गायी, घोडे, ज्येष्ठ, श्रेष्ठ आणि कनिष्ठ या सर्वांस माता आदि करून स्त्रियांनीं ओं-वाळावें " अपमृत्युचा नाश व्हावा एतदर्थ त्रयोदशीचे दिवशीं यमासाठीं प्रदोषकालीं घरापासून बाहेर दिवा लावावा. ह्याच त्रयोदशीला आरंभ करून गोत्रीरात्री व्रत करावें. त्याचा प्रयोगक कौस्तुभांत पहावा "

या वरील प्रमाणावरून धनतेरसेच्या संबंधाचें व्रत द्वादशीस चालू होतें, असें उघड झालें शिवाय या सणाचा किंवा व्रताचा उद्देश पारमार्थिक आणि अपमृत्यु नाशक आहे. हेंही निराळें सांगावयास नको. आतां चतुर्दशीविषयीं धर्मसिंधूंत जें सांगितलें आहे तें:—

" नरकाला भिणारे जे आहेत; त्यांनीं चंद्रोदय व्यापिनी अशा आश्विन कृष्ण चतुर्दशीचे दिवशीं तिल तैलाचा अभ्यंग करून स्नान करावें. या विषयीं रात्रीच्या शेवटच्या प्रहरापासून आरंभ करून अरुणोदयापर्यंत, तेथून चंद्रोदयापर्यंत, तेथून सूर्योदयापर्यंत, याप्रमाणें तीन कालांमध्यें पहिला पहिला गौण व पुढचा पुढचा श्रेष्ठ आहे. या करितां चंद्रोदयानंतरचा तो मुख्य काल आणि प्रातःकाल तो गौण काल जाणावा. त्यांत पूर्व दिवशींच चंद्रोदयव्याप्ति असेल. तर पूर्व दिवसाची करावी. दुसऱ्या दिवशींच चंद्रोदयव्या

पिनी असेल तर दुसऱ्या दिवसाची घ्यावी. ह्या चंद्रोदय व्याप्ती पक्षीं त्या दिवशीं सूर्यास्तादिकालीं करण्याविषयीं सांगितलेलें असें उल्कादान ( कोलिथ दाखविणें ) दीपदान इत्यादि कर्में तीं चंद्रोदयकालीं चतुर्दशी नसली तत्रापि करावींत. दोन्हीं दिवस चंद्रोदयव्याप्ती असेल तर पूर्व दिवसाची घ्यावी. दोन दिवशीं चंद्रोदयव्याप्ति नसेल तर तीन पक्ष संभावतात. पूर्व दिवशीं चंद्रोदयानंतर उषःकाळाला व सूर्योदयाला व्यापून राहणारी चतुर्दशी ती दुसऱ्या दिवशीं चंद्रोदयाच्या पूर्वीं समाप्त झाली या विषयीं उदाहरणः–

त्रयोदशी घ० ५८ प० ५० चतुर्दशी घ० ५७ ह्या पहिल्या पक्षीं, चतुर्दशीनें युक्त अशा उषःकालाच्या प्रदेशाचे ठिकाणीं अभ्यंग करावे. या नंतर पूर्व दिवशींच चतुर्दशी केवळ सूर्योदयाला मात्र व्यापून राहणारी, आणि दुसऱ्या दिवशीं चंद्रोदयाच्या पूर्वीं समाप्त झाली. अथवा सूर्योदयाला स्पर्श नाहीं तेव्हां चतुर्दशीचा क्षय आहे; उदाहरणः–

त्रयोदशी घ० ५९ प० ५९ चतुर्दशी घ० ५७, अथवा दुसरे उदाहरण,–त्रयोदशी घ० २ त्या दिवशीं चतुर्दशी घ० ५४, ह्या दोन पक्षांचे ठिकाणीं दुसऱ्या दिवशीं चंद्रोदयकालीं स्नान करावें; कारण चतुर्थ प्रहर इत्यादिक

जो स्नानाचा गौणकाल त्यां कालीं चतुर्दशीची व्याप्ति आहे. ह्या दोन पक्षीं कित्येक ग्रंथकार, अरुणोदयाच्या पूर्वीं सुद्धां चतुर्दशीमध्येंच स्नान करावें, असें ह्मणतात. दुसरे ग्रंथकार तर, अरुणोदयानंतर चंद्रोदय इत्यादिक जो काळ तो अमावास्येनें युक्त असेल, तथापि त्याचे ठायीं स्नान करावें; असें ह्मणतात. चतुर्दशीचा क्षय असेल तर, पूर्व दिवशींच त्रयोदशीचे ठिकाणीं चंद्रोदयकालीं स्नान करावें असें जें कितीएक ग्रंथकार ह्मणतात तें योग्य नाहीं. ह्या अभ्यंग स्नानाविषयीं विशेष प्रकार—

॥ सिता लोष्ट समायुक्त सकंटक दलान्वित ॥

॥ हरपापमपामार्ग भ्राम्यमाणः पुनः पुनः ॥

ह्या मंत्रेंकरून नांगरानें उकरून काढलेलें असें मातीचें ढेंकूळ, अघाडा, दुधीभोपळी आणि टाकळा यांच्या फांद्या स्नानामध्यें तीन वेळ आपल्या अंगावरून फिरवाव्या. अभ्यंगस्नान केल्यानंतर गंधादिकाचा टिळक लावून मग, कार्तीक स्नान करावें. पूर्वीं सांगितलेल्या मुख्य कालाचे ठिकाणीं स्नान न झालें तर सूर्योदयानंतर गौण कालांसही करावें. संन्यासी इत्यादिकांनीं सुद्धां अवश्य अभ्यंग करून स्नान करावें. कार्तिक स्नान केल्यावर यम तर्पण करावें. तें;— ॥ यमायनमः यमं तर्पयामि ॥ असें ह्मणून दक्षिण दिशेकडे

तोंड करून सव्यानें अथवा अपसव्यानें तीन अंजळि द्यें. तीर्थें करून किंवा पितृतीर्थें करून द्याव्या. ( देवतीर्थ म्हणजे अंगुलीच्या अग्रांनीं आणि पितृतीर्थ म्हणजे अंगुष्ठ व तर्जनी यांच्या मध्येभागें करून ) याचप्रमाणें पुढें सांगितलेल्या मंत्रांनीं पूर्वी सांगितल्याप्रमाणें तर्पण करावें. तें मंत्र—

॥ धर्मराजायनमः धर्मराजंतर्पयामि; मृत्युवेनमः मृत्युं तर्प०, अंतकाय०, अतकं, वैवस्वतायनमः वैवस्वतंत०, कालायनमः कालं०, सर्वभूतक्षयाय० सर्वभूतक्षयंत० औदुंबराय० औदुंबरंत०, दध्नाय० दधन्त०; नीलाय० नीलंत०, परमेष्टिनेन० परमेष्टिनंत० वृकोदरा० वृकोदरंत०; चित्राय० चित्रंत०; चित्रगुप्तायन० चित्रगुप्तंत० ॥

ज्याचा पिता जिवंत असेल त्यानें यमांनीं देवतीर्थें करून तर्पण करावें " तदनंतर प्रदोषकालीं सुशोभित असे दिवे, देवालय, मठ, तट, कोट, बाग, मार्ग, गोठा, अश्वशाला, गजशाला इत्यादिकांचे ठायीं लावावे. याप्रमाणें तीन दिवस आराध करावी " तूळ राशीला सूर्य गेल्यानंतर चतुर्दशी व अमावास्या या दोन दिवशीं प्रदोषकालीं पुरुषांनीं हातांत कोलित, चुडी हीं घेऊन पितरांला मार्ग दाखवावा. ( दिवाळीच्या सणांत आपण दारू जाळतों. याचें मुख्य कारण हें आहे. परंतु मूळाकडे न पाहतां अविचारानें तुथेच

उपहास करणारे जे पाद्री लोक, त्यांस हें कोठून माहित असणार!!!) त्याचा मंत्रः-

अग्निदग्धाश्च ये जीवा येऽप्यदग्धाः कुलेमम ॥
उज्वलज्ज्योतिषादग्धास्तेयांति परमांगतिं ॥
यमलोकं परित्यज्य आगताये महालये ॥
उज्वलज्ज्योतिषावर्त्मप्रपश्यंतु व्रजंतु ते ॥

त्या दिवशीं दिवशीं नक्तभोजन केलें असतां महाफल आहे

नरकचतुर्दशीच्या संबंधानें शास्त्रार्थ इतकाच आहे. तरी यावरून तत्व पाहणारांस, या सणाचा उद्देश काय आहे ? इकडे लक्ष्य द्यावें अशी आह्मीं शिफारस करितों.

"यानंतर आश्विन अमावास्येचे दिवशीं प्रातःकालीं तैलाभ्यंग करून स्नान करावें, प्रदोषकालीं दिवे लावावे आणि लक्ष्मीचें पूजन इत्यादि करावें. त्याविषयीं सूर्योदयाला व्यापून सूर्यास्तानंतर एक घटिकेपेक्षां अधिक अशी रात्रि व्यापिनी अमावास्या असेल तर संशय नाहीं. ह्या अमावास्येचे दिवशीं प्रातःकालीं तैलाभ्यंग करून स्नान करावें: नंतर देवपूजा इत्यादि करून अपराण्हकालीं पार्वण श्राद्ध करावें, व प्रदोषकालीं दिवे लावावे, उल्का दर्शन आणि लक्ष्मीपूजन हीं कृत्यें करून भोजन करावें. ह्या अमावास्येचे दिवशीं बाल, वृद्ध आणि रोगी या वांचून इत-

रोनीं दिवसा भोजन करूं नये, रात्रीं भोजन करावें, असा वचन प्रयुक्त विशेष जाणावा. तसेंच दुसऱ्या दिवशींच प्रदोषव्याप्ति असेल तर दुसऱ्या दिवसाची घ्यावी, पूर्व दिवशींच प्रदोषव्याप्ति असेल तर लक्ष्मीपूजन इत्यादिकांविषयीं पूर्व दिवसाची घ्यावी. अभ्यंग स्नान इत्यादिकांविषयीं दुसऱ्या दिवसाची घ्यावी. पुरुषार्थ चिंतामणिमध्यें तर पूर्व दिवशींच प्रदोषव्यापिनी आहे, असा पक्ष असेल तर दुसऱ्या दिवशीं तीन प्रहरांपेक्षां अधिक अशी अमावास्या असतां अमावास्येहून प्रतीपदा वाढती असल्यास लक्ष्मीपूजनादिक सुद्धां दुसऱ्या दिवशींच करावें, असें सांगितलें. ह्या मतानें दोन दिवशीं प्रदोषव्यापिनी नाहीं, असा पक्ष असतांही दुसऱ्या दिवशीं अमावास्या साडेतीन प्रहरांपेक्षां अधिक व्यापिनी आहे, याकारितां दुसऱ्या दिवसाचीच घेण्याविषयीं योग्य असें वाटतें. चतुर्दशी, अमावास्या आणि प्रतीपदा ह्या तीन दिवसांला ‘ दीपावलि ’* असें नांव आहे. ह्या तीन

*मागील पृष्ठावरून—दिवाळीविषयीं शास्त्रार्थ सांगण्याचे आधीं आमच्या मतें दिवाळीचें सहा दिवस असावेत असें सांगितलें आहे. त्याचें कारण, धर्ममतानें तीनच दिवसांत ‘ दीपावलि ’ असें नांव असतां आपण जर पांच दिवस मानतों; तर व्रत प्रमाणाला अनुसरून ती अधुरी होते असें समजावें.

दिवसांत ज्या दिवशीं स्वाती नक्षत्राचा योग असेल तो दिवस अति उत्तम असें समजावें. अमावास्येचे दिवशीं मध्यरात्री नंतर नगरांतील स्त्रियांनीं आपापल्या गृहसंबंधीं आंगण्यांतून अलक्ष्मीला (अवदसेला) घालवावी (केर काढावा.")

अमावास्येचा दिवस हा या सणांतील मुख्य दिवस आहे. असे या शास्त्रार्थावरूनही सिद्ध होत असतां या दिवसाच्या संबंधानें पुरातन ऐतिहासिक कथा कोठेंही सांपडत नाहीं, ह्मणून आह्मीं फार दिलगीर आहों. तरीही जें निखालस व्रतच आहे, तें पूर्वांपार सर्व लहान थोर करीतच आले आहेत, असें समजून वाचकांनीं कथेची अपेक्षा धरूं नये, अशी आमची विनंती आहे.

"यानंतर कार्तिक शुक्ल प्रतिपदेचे दिवशीं तैलाभ्यंग अवश्य करावा. चतुर्दशी आदिकरून तीन दिवस उत्साह न केला तर नरकप्राप्ती होते, असें दोषश्रवण आहे. आणि उत्सव केला असतां लक्ष्मीची प्राप्ति होऊन अलक्ष्मीचा नाश होतो, इत्यादिक फलाचें श्रवण आहे, याकरितां हा उत्सव नित्य व काम्य असा दोन प्रकारचा आहे. ह्या प्रतिपदेचे दिवशीं बलिदैत्याची पूजा, दीपोत्सव, गोक्रीडा, गोवर्द्धनपूजा, मार्गपाली बंधन, तृणाची दोरी मोडणें आणि

नवीं वस्त्रें धारण करणें इत्यादिक उत्सव, द्यूत करणें, स्त्रियांनीं ओंवाळणें आणि मंगलमालिका इत्यादि कृत्यें करावीं. त्यामध्यें जर उदयाला व्यापून वीस घटिका प्रतिपदा असेल तर त्या दिवशीं चंद्रदर्शन नाहीं, याकारितां चंद्रदर्शनयुक्त जी द्वितीया तिच्या वेधाचा निषेध त्या दिवशीं प्राप्त होत नाहीं, यास्तव सर्व कृत्यें दुसऱ्या दिवसाच्या प्रतिपदेचे ठिकाणींच होतात. इष्टीच्या निर्णयप्रकरणीं प्रतिपदेचे दिवशीं सहा घटिका द्वितीयेचा प्रवेश असल्यानें चंद्रदर्शन होतें. ह्मणून जें सांगितलें, ते सूक्ष्मदृष्टीच्या अभिप्रायानें सांगितलें. ह्या स्थलीं तर स्थूलदर्शन तेंच निषेधास कारण आहे. व तें चंद्रदर्शन बारा घटिका द्वितीया प्रविष्ट झाली असेल तरच होतें त्यापेक्षां विरोध नाहीं असें वाटतें. जर सूर्योदयापासून प्रतिपदा आठ मुहूर्त्त आहे, व नववा मुहूर्त नाहीं, तर बलिपूजा, गोक्रीडा, गोवर्द्धनपूजा, मार्गपाली बंधन, आणि वष्टिकाकर्षण हीं कृत्यें पूर्व तिथीनें विद्ध अशा प्रतिपदेचे ठिकाणीं करावीं. तैलाभ्यंग, नवीन वस्त्रादिकाचे धारण, द्यूत, स्त्रियांनीं दिवे ओंवाळणें, मंगलमालिका इत्यादि कृत्यें सूर्योदयकालीं दोन घटिका व्याप्ति असली तत्रापि तिचे ठिकाणींच करावीं. बलिपूजा इत्यादिक कृत्यें कांहींएक निमित्तानें पूर्व तिथीनें विद्ध अशा प्रतिपदा

देचे दिवशीं न होतील तर पुढच्या तिथीनें विद्ध अशा प्रतिपदेचे ठिकाणीं करावीं, परंतु कर्माचा त्याग करूं नये व दुसऱ्या तिथीचे ठिकाणीं करूं नये. जसें बौद्धायनीय शाखी इत्यादिकांनीं आपल्या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें अनुष्ठान न झाल्यास आपस्तंबीय इत्यादिक सुत्रांत सांगितल्याप्रमाणें अनुष्ठान करावें, परंतु कर्माचा लोप किंवा अन्यशाखेचे ग्रहण इत्यादिक करूं नये. त्याप्रमाणें हेंही करावें असें माधवाच्या ग्रंथांत आहे. या प्रतीपदेचे दिवशीं राजानें पांच प्रकारच्या रंगांनीं दोन भूजांनीं युक्त अशी बलीची मूर्ती काढून पूजा करावी. इतर लोकांनीं पांढऱ्या तांदुळांची मूर्ती करून पूजा करावी. पूजेचा मंत्र,–

॥ बलिराज नमस्तुभ्यं विरोचन सुतप्रभो,
भविष्येंद्र सुराराते पूजेयं प्रतिगृह्यताम् ॥

बलिच्या उद्देशेंकरून जें कोणतेंही दान केलें तें अक्षय्य विष्णूची प्रीति करणारें होतें ह्या प्रतिपदेचे दिवशीं जो हर्ष, दैन्यरूपभावानें राहतो त्याचें सर्व वर्ष तसें जातें. म्हणजे दैन्यपणानें राहील तर सर्व वर्षभर दैन्यपणा प्राप्त होतें आणि हर्षानें राहील तर वर्षभर हर्ष प्राप्त होतो, असें तात्पर्य. ह्या प्रतिपदेचे दिवशीं प्रातःकाली सर्व मनुष्यांनीं द्यूतकर्म करावें, त्या द्यूतांत ज्याचा जय होतो त्याचा वर्ष-

भर जय होतो. प्रशस्त ( सत्पात्र ) ब्राह्मणासह वर्तमान पक्वान्नाचें भोजन करावें. *बलिराज्याचे दिवशीं दिवे लाविले असतां लक्ष्मी सार्वकाल स्थिर राहते. दिवे लावून ओवाळावें असा विधि आहे याकरितां ह्या प्रतिपदेला 'दीपावलि' असें नांव आहे. हे केशवा, बलिराज्याचे दिवशीं ज्यांनीं दीपाची पंक्ति लाविली नाहीं, त्यांचे गृहाचे ठायीं दिवे कसे प्रज्वलित होतील ! इत्यादि.

ह्या प्रतिपदेचे दिवशीं लक्ष्मी व कुबेराची पूजा करावी. ॥ लक्ष्मीर्या लोकपालानां धेनुरूपेण संस्थिता ॥ घृतंवहति यज्ञार्थे ममपापं व्यपोहतु अग्रत संतुमे गावो गावो मे संतुपृष्ठतः ॥ गावोमे हृदये संतु गवां मध्ये वसाम्यहं ॥ ह्या मंत्रांनीं सवत्स गाईची व वृषभांची पूजा करून पुष्पांच्या माला इत्यादिक घालून त्यांला भूषित करावें. त्या दिवशीं गाईचे दूध काढणें व बैलावर भार घालणें इत्यादिक करूं नये.

ह्याच दिवशीं ज्यांला मुख्य गोवर्धन पर्वत जवळ असेल त्यांनीं त्याचीच पूजा करावी. तो जवळ नसेल तर गोमयाचा किंवा अन्नराशीचा गोवर्द्धन पर्वत करून त्या गोवर्धनासहित गोपालाची पूजा करावी. त्या पूजेविषयीं,–

---

*अश्विन वद्य चतुर्दशीपासून जे तीन दिवस, त्यांला 'बलिराज्य' असें नांव आहे.

श्रीकृष्णप्रीत्यर्थं गोवर्धन पूजनं गोपाल पूजनात्मकं महोत्सवं करिष्ये. असा संकल्प करून ॥ बलिराजोद्धारपालो भवानद्य भव· प्रभो ॥ निजवाक्यार्थनार्थाय सगोवर्धन गोपते ॥ ह्या मंत्रेकरून गोवर्धनयुक्त गोपालाचें आवाहन करून स्थापना करावी. तदनंतर, ॥ गोपालमूर्ते विश्वेश शक्रोत्सवविभेदक ॥ गोवर्धन कृतच्छत्र पूजां मेहरगोपते ॥ गोवर्धनधराधार गोकुलत्राणकारक ॥ विष्णु बाहुकृतच्छाय गवांकोटी प्रदोभव ॥ ह्या मंत्रांनीं श्रीगोपाल व गोवर्धन यांची षोडशोपचारें करून पूजा करावी. त्या पूजेमध्यें जशी संपत्ति असेल तसा महानैवेद्य. ( अन्नाचा पर्वत ) द्यावा; त्यानंतर त्याच्या अंगत्वेंकरून प्रत्यक्ष गाईचे ठिकाणीं किंवा मृत्तिकेची गाई करून तिचे ठिकाणीं पूर्वीं सांगितलेल्या मंत्रांनीं गोपूजा करून ॥ आगावो अगमन्नैते वदंतु० ॥ ह्या ऋचांनीं, घरांत सिद्ध केलेल्या चरूचांचा होम करावा. ब्राह्मणांला अन्न आणि गाई यांचे दान करावें, गाईला तृण घालावें आणि पर्वताला बलिदान करावें. तदनंतर बरोबर गाई घेऊन गाई, ब्राह्मण, होम, अग्नि आणि पर्वत यांला प्रदक्षिणा करावी.

यानंतर अपराण्हकालीं मार्गपाली बंधन करावें तें असें:-जसा ज्याचा आचार असेल तदनुसार कुशांचा किंवा मोळाचा मोठा दोर करून तो दोर पूर्व दिशेच्या मार्गावर

उंच खांबाला व वृक्षाला बांधून 'मार्गपालि नमस्तेस्तु सर्व लोक सुखप्रदे ॥ विधेये' पुत्रदाराद्यैः पुनरेहि व्रतस्यमे ॥ ह्या मंत्रानें नमस्कार करून प्रार्थना करावी, आणि त्या दोराच्या खालून जो मार्ग असेल, त्या मार्गानें गाई, हत्ती, घोडे इत्यादिकांसहवर्तमान ब्राह्मण, राजा इत्यादिकानीं गमन करावें त्याचप्रमाणें मोळ इत्यादिक तृणांचा मोठा दोर करून त्या दोराला एकीकडे राजपुत्रांनीं धरावें आणि दुसरीकडे हीन जाति असतील त्यांनीं धरून जय परीक्षा पाहण्यासाठीं तो दोर आपापल्याकडे ओढावा. ह्या ओढण्यांत हीन जातीचा जय झाला तर राजाचा जय आहे असें समजावें. द्यूत व स्त्रियांनीं ओवाळणें, हीं कर्मे प्रातःकाळीं करावीं. रात्रौ नृत्य, गायन, वाद्यें वाजविणें इत्यादि उत्सव करावा. ब्राह्मण, आप्त, बांधव यांला नवीं वस्त्रें देऊन त्यांचा पूजा सत्कार करावा.

याप्रमाणें बलिप्रतीपदेविषयीं शास्त्रार्थ आहे. यांत जें द्यूत, नृत्य, गायन, इत्यादि सांगितलें आहे, त्याचा भावार्थ लाक्षणिक असून हिंदुधर्म द्वेष्टे त्यांचा भलताच अर्थ करितात. द्यूतकरून वर्षभर जयापजयाविषयीं ताळा पाहणें आहे. परंतु हें, जे सदोदित जुगार खेळणारे आहेत त्यांस लागू नाहीं, आणि येवढ्यावरूनच सदोदित जुगार खेळावा,

असें होत नाहीं तसेंच गीत वाद्यादिकांनीं हा दिवस सा-
नंदांत जावें, असा शास्त्रार्थ अस-
वरील आरोपांहून शेवटचा आणि ?? करितात,
आमच्यावर असा करितात,—लक्ष्मी धनसंपदा, हिलाचें
मानून तिची पूजा करणें हें मोठें सदोषकर्म होय. सर्व भा
ंडाराचा दाता व अधिपती ईश्वर आहे. त्याविषयीं असें
म्हटलें कीं "पृथ्वी ईश्वराची आहे व तिजमधील सर्व पूर्णता
त्याची आहे. तर जेणेंकरून त्याचा महिमा व आपलें सुख
वाढेल अशी धनसंपदा विनयानें मागणें सोडून धनाचीच
पूजा केली असतां ईश्वरांस क्रोध येणार नाहीं कीं काय ?
तर मी त्यांस उत्तर देतो कीं दिवाळींतील आमच्या कोण
त्याही कृत्यानें ईश्वरास क्रोध येणार नाहीं कारणः आमचे
पूर्वज जे तत्ववेत्ते ऋषी आणि धर्मनिबंधकार ते असें म्हण-
तात कीं ईश्वर सर्वांभूतीं आहे ही अगदीं प्रचारांतील म्हण
मी सांगितली तरी हिला कल्पित किंवा निराधार समजूं
नका. हिला वेदाचे प्रमाण पुरुषसूक्तांची पहिली ऋचा.
तेणकरून अवैधव्य आणि भ्रात्याला चिरकाल आयुष्य,
असें फळ मिळतें तें न केलें असतां सप्त जन्मपर्यंत भ्रा-
त्याचा नाश होतो ही यमद्वितीया पूर्व दिवशींच अपराण्ह-

व्यापिनी असेल तर पूर्व दिवसाची घ्यावी. दोन दिवशीं अपराण्ह व्यापिनी असेल किंवा नसेल इत्यादिक दुसऱ्या दिवसाची घ्यावी. ह्या द्वितीयेचे दिवशीं यमुनास्नान, अपराण्हकालीं चित्रगुप्त आणि यमदूतांसह यमाचें पूजन, यमाला अर्घ्यदान हीं कर्मे करावीं.

प्रिय देशबांधवहो, वरील धर्मसिंधूच्या आधारावरून दिवाळीच्या दिवसांत आपण कसें वागावें आणि काय काय करावें ? हें तुमच्या ध्यानांत येईलच व मागें लिहील्याप्रमाणें दिवाळीचे सहा दिवस असावे, हेंही खरें वाटेल तरीही दिवाळीचे दिवस पांचच मानण्याचा सर्वत्र परिपा आहे. यासाठीं तोच आपणांलाही ग्राह्य होय.

आतां ख्रिस्ती लोक जें ह्मणतात. दिवाळीच्या स णांत सदाचरण व नीति यास भ्रष्टत्व प्राप्त होतें तें कसें हें त्यांचें बोलणें सर्वथैव असत्य व निराधार आहे. उघड रीतीनें पाहतां दिवाळीच्या दिवसांत आह्मीं आपल्या धर्माप्रमाणेंच वागत असतों, आणि मागें सांगितल्याप्रमाणेंच तिन्हीं प्रकारचा ( शेती, व्यापार आणि चाकरी ) उद्योग करणारी आमची हिंदुप्रजा या दिवसांत आनंदांतच सते, ह्मणून आमच्या ऐपतीप्रमाणें आह्मीं हें दिवस दांतच घालविले पाहिजेत.

मित्रहो, त्यांच्या सर्व निबंधाचा विचार करून पा हतां पहिल्यानें ते आपणांवर या दिवसांत आपण जें दारू-काम जाळतों, त्याबद्दल दोषारोप करितात. तर बाबांनों, जे खरोखर आनंदाचे दिवस, त्या दिवसांत सर्वच कृत्यें म-नाला आनंद देणारीं घडावीं, अशी सर्वत्रांची इच्छा असते ह्मणून मागें सांगितल्याप्रमाणें 'उल्कादान' करण्या ऐवजीं दारू जाळण्याचा परिपाठ पडला. ही चाल मोडून केवळ निरर्थक ( तरी धर्माप्रमाणें कोलिथें दाखविलींच पाहिजेत हें विसरूं नका बरें ). होणारा खर्च एकाद्या चांगल्या कृ-त्याकडे लावावा, हें रास्त आहे आणि लोकांनीं विनाकार-ण खर्च करूं नये, अशी ही आमची इच्छा आहे, परंतु ही चाल मोडणें फार कठिण आहे. दारू जाळणें हें फार धोक्याचें आहे. हें सर्वांस समजत असूनही ज्यापेक्षां कि-त्येक युगें हें काम चाललेंच आहे, त्या पेक्षां आनंद झा-ल्यावर उत्साह करवासा वाटणें, हा जो मनुष्य व्यक्तीचा साधारण मनोधर्म, तोच ही चाल मोडूं देत नाहीं, असें ह्म-णावें लागतें. तर 'होणें जाणें ईश्वराधीन आहे' या ह्मणीवर असें फळ पुरवून आमच्यांतील समंजस लोकांनीं आपल्या उप-त्याचा नाप कुठारानें हा परिपाठ वृक्ष मोडावा, अशी आह्मी रस करितों. पण जोंपर्यंत ही शिफारस अमलांत ये-

असें असूनही सर्व ईश्वरमयच जाणावें इत्यादि अशी आज्ञा वेदांतही आहे, तर आह्मीं लक्ष्मी ( द्रव्य ) रूप ईश्वर विभूतीची मनोभावानें पूजा केल्यास ईश्वराला राग न येतां तो आमच्याकडे अनुरागानें ( प्रीतीनें ) पाहील, याबद्दल मुळींच शंका धरण्याचें कारण नाहीं. यासाठीं माझे प्रिय हिंदु बांधवहो, या दिवाळींत विराग्यानें ( योग्यानें ) ही मंगलस्नान करून आनंद करावा. आणि मंगळसमारंभानें जगव्यापक परमेश्वराची आराधना करून नरकादि भयापासून मुक्त व्हावें अशी जी शास्त्राज्ञा आहे, तिला अनुसरून वागाल तर ईश्वर तुमचे अखंड कल्याण करून अति सौख्य देईल.

प्रथम भाग समाप्त.

मित्रहो, त्यांच्या सर्व निबंधाचा विचार करून पा- हतां पहिल्यानें ते आपणांवर या दिवसांत आपण जें दारू-काम जाळतों, त्याबद्दल दोषारोप करितात. तर बाबांनों, जे खरोखर आनंदाचे दिवस, त्या दिवसांत सर्वच कृत्यें म- नाला आनंद देणारीं घडावीं, अशी सर्वत्रांची इच्छा असते ह्मणून मागें सांगितल्याप्रमाणें 'उल्कादान' करण्या ऐवजीं दारू जाळण्याचा परिपाठ पडला. ही चाल मोडून केवळ निरर्थक ( तरी धर्माप्रमाणें कोठिथें दाखविलींच पाहिजेत हें विसरूं नका बरें ). होणारा खर्च एकाद्या चांगल्या कृ- त्याकडे लावावा, हें रास्त आहे आणि लोकांनीं विनाका- रण खर्च करूं नये, अशी ही आमची इच्छा आहे, परंतु ही चाल मोडणें फार कठिण आहे. दारू जाळणें हें फार धोक्याचें आहे. हें सर्वांस समजत असूनही ज्यापेक्षां प्र- त्येक युगें हें काम चाललेंच आहे, त्या पेक्षां आनंद झा- ल्यावर उत्साह करवासा वाटणें, हा जो मनुष्य व्यक्तीचा साधारण मनोधर्म, तोच ही चाल मोडूं देत नाहीं, असें ह्म- णावें लागतें. तर 'होणें जाणें ईश्वराधीन आहे' या ह्मणीवर धरून आमच्यांतील समंजस लोकांनीं आपल्या उप- देशरूप कुठारानें हा परिपाठ वृक्ष मोडावा, अशी आह्मी शिफारस करितों. पण जोंपर्यंत ही शिफारस अमलांत ये-

तेणेक
असें फ
त्याचा

( चढाई ) करण्यासाठीं आज्ञा मागूं लागला; तरी त्याचा मुख्य प्रधान महाविचारी होता, तो सर्वांस उद्देशून राजास ह्मणाला. महाराज, आपल्या पदरीं हे वीर प्रत्यक्ष यमालाही जिंकून आपल्या पायांजवळ घेऊन येतील अशी माझी खातरी आहे; तरी ही माझी थोडीशी विनंती आहे, ती श्रवण करून मग महाराजांनीं जसें वाटेल तसें करावें.

आपण जरी कितीही पराक्रमी असलों, तरी देव अमृतपान करणारे असल्यामुळें अमर आहेत, त्यांचे समोर आपण शतवर्षें जरी लढलों, तरी ते मरण पावणार नाहींत; याबद्दल महाराजांनीं थोडासा विचार केला तरी कळून येणार आहे. ह्मणून मी असें ह्मणतों कीं, देवांचा तेजोभंग करण्याची इच्छा असेल तर कांहीं तरी कपट युक्ति योजूनच कार्य सिद्ध केलें पाहिजे. हा विचार त्या भौमासुरास योग्य वाटला व त्यानें सर्व वीरांस शांत करून जाग्यावर बसविलें आणि प्रधानास सांगितलें. तुझे विचार पोक्तपणाचे आहेत यांत संशय नाहीं. कपटकृति केल्याशिवाय देव हारीस येणार नाहींत. यासाठीं मी स्वतः एकटाच त्यांजकडे गुप्तरूपानें जातों, आणि जसा लाग साधेल त्याप्रमाणें देवांचा तेजोभंग करून परत येतों, तोंपर्यंत तूं या राज्याचें मात्र उत्तम संरक्षण कर. असें सांगून तो गुप्तरूपानें आपल्या रा-

प्रकरण २ रें.

## दिवाळीच्या कथा.

## नरक चतुर्दशीची कथा.

नैमिषारण्यांत सनकादि मुनि सहस्र वर्षांनीं समाप्त होणारें महासत्र करीत असतां प्रत्येक दिवशीं यज्ञानुष्ठान समाप्त झाल्यावर विश्रांतीसाठीं सूताजवळ येऊन बसत. आणि त्याला प्रश्न करून अनेक कथा श्रवण करीत असत, त्या ऋषींच्या प्रश्नावरून सूत सांगतात.

कोणे एके वेळीं प्राग्ज्योतिषपुरीचा राजा भौमासूर मदोन्मत्त होत्साता आपल्या प्रधानादिकांस ह्मणतो हे महावीरहो, तुमच्या साह्यानें मी पृथ्वीवरील सर्व राजे पादाक्रांत केले; कित्येकांच्या अविवाहित सुंदर कन्या आणून बंदिशाळेंत ठेविल्या; तरी मनाला उल्हास होत नाहीं. ह्मणून कोणत्या तरी प्रयत्नानें इंद्राचा तेजोभंग करावा, अशी इच्छा उत्पन्न झाली आहे. ती कशी पूर्ण होईल ? असें आपल्या राजाचें भाषण ऐकतांच प्रत्येक मुत्सद्दी इंद्रावर स्वारी

( चढाई ) करण्यासाठीं आज्ञा मागूं लागला; तरी त्याचा मुख्य प्रधान महाविचारी होता, तो सर्वांस उद्देशून राजास ह्मणाला. महाराज, आपल्या पदरीं हे वीर प्रत्यक्ष यमालाहि जिंकून आपल्या पायांजवळ घेऊन येतील अशी माझी खातरी आहे; तरी ही माझी थोडीशी विनंती आहे, ती श्रवण करून मग महाराजांनीं जसें वाटेल तसें करावें.

आपण जरी कितीही पराक्रमी असलों, तरी देव अमृतपान करणारे असल्यामुळें अमर आहेत, त्यांचे समोर आपण शतवर्षें जरी लढलों, तरी ते मरण पावणार नाहींत; याबद्दल महाराजांनीं थोडासा विचार केला तरी कळून येणार आहे. ह्मणून मी असें ह्मणतों कीं, देवांचा तेजोभंग करण्याची इच्छा असेल तर कांहीं तरी कपट युक्ति योजूनच कार्य सिद्ध केलें पाहिजे. हा विचार त्या भौमासुरास योग्य वाटला व त्यानें सर्व वीरांस शांत करून जाग्यावर बसविले आणि प्रधानास सांगितले. तुझे विचार पोक्तपणाचे आहेत यांत संशय नाहीं. कपटकृति केल्याशिवाय देव हारीस येणार नाहींत. यासाठीं मी स्वतः एकटाच त्यांजकडे गुप्तरूपानें जातों, आणि जसा लाग साधेल त्याप्रमाणें देवांचा तेजोभंग करून परत येतों, तोंपर्यंत तूं या राज्याचें मात्र उत्तम संरक्षण कर. असें सांगून तो गुप्तरूपानें आपल्या रा-

ऊ तून निघाला तो अमरावतीस आला आणि इतर संचार करून पाहूं लागला, पण देवांचा मानभंग होईलः असें कृत्य करण्याची संधी त्यास सांपडेना, शेवटीं फिरतां फिरतां ज्या ठिकाणीं देवमाता अदिती होती, त्या ठिकाणीं गेला आणि पाहूं लागला, तों ती महा प्रभावान् देवमाता ध्यानस्थ बसली आहे व सर्व देवस्त्रिया तिच्या सेवेसाठीं उभ्या राहिल्या आहेत असें पाहतांच भोमासुरानें आदितीचीं कीरीट कुंडलें हरण केलीं आणि आपला मार्ग धरिला. नंतर कांहीं वेळानें ती ध्यान विसर्जन करून भूषणें पाहूं लागली; पण जीं दैत्यहरण करून घेऊन गेला, तीं तिला कशीं सांपडणार ? शेवटीं कोठेंही पत्ता नाहीं, असें पाहून ती दुखित झाली.

इतक्यांत इंद्रादिदेव तिच्या दर्शनास आले आणि तिला विमनस्क जाणून विचारूं लागले; तेंव्हां तिनें आपलीं भूषणें कोणी चोरून नेल्याचें वर्तमान सांगितलें, ते ऐकतांच सर्व देवांस मोठी चिंता उत्पन्न झाली आणि ते सर्व एके ठिकाणीं विचार करीत बसले.

इतक्यांत बृहस्पति ( देवगुरु ) त्या ठिकाणीं आले आणि देवांसह इंद्रास चिंतित पाहून कारण विचारूं लागले. तेंव्हां इंद्रानें सांगितलें महाराज गुरुवर्य, आमच्या मातेचीं

णें कोणीं दुष्ट गुप्त रूपानें येऊन घेऊन गेला. ह्मणून आह्मीं सर्व चिंतातुर झालों आहों!

असें ऐकतांच गुरुनें अंतर्ज्ञानानें भौमासुराचें कृत्य जाणून इंद्रास सांगितलें आणि तीं भूषणें परत मिळण्याची अशी युक्ती सांगितली कीं भगवंतानें, दुष्टांचा निःपात करून भूभार उतरावा, या हेतूनें अवतार घेऊन सांप्रत द्वारकेंत वास्तव्य केलें आहे. त्या भगवंतास शरण जाशील, तर तो त्याला दंड करून तुझ्या मातेचीं भूषणें तुला परत आणून देईल तुझी इच्छा असेल तर मीही तुजबरोबर त्या श्रीकृष्णाचे दर्शनास येतों.

असें ऐकतांच इंद्र, बृहस्पति प्रभृति, सर्व देवांस घेऊन द्वारकेंत आला त्या वेळेस गोपालकृष्ण सत्यभामेचे मंदिरांत बसले होते. इंद्रानें त्या मंदिराच्या कामगाराकडून आपण आल्याची वर्दी लावली आणि आंतून हुकूम आणवून त्यांजपाशीं गेला व भौमासुराचें गाऱ्हाणें सांगूं लागला. तें सर्व गोपालकृष्णांनीं ऐकून घेऊन त्यास सांगितलें. शरणांगताचें रक्षण करणें हेंच माझें कर्तव्य आहे, तर तूं स्वस्थ चित्तानें आपल्या ठिकाणीं जा. मी त्याला दंड करून तुझ्या मातेचीं भूषणें आणून देतों. त्यानें आदितीचा अपमान केला नाहीं, तर माझ्या मतानें प्रत्यक्ष देवकीचाच केला आहे,

असें मी समजतों. इत्यादि अनेक प्रकारांनीं सांगून गोपाल कृष्णानें त्याचे शांतवन केलें आणि त्यास पाठवून देऊन आपण युद्धाची तयारी केली.

तेव्हां सत्यभामा त्यास (कृष्णास) ह्मणूं लागली, मी आजपर्यंत युद्धाच्या गोष्टी पुष्कळ ऐकिल्या आहेत; पण प्रत्यक्ष युद्ध कसें तें पाहिलें नाहीं. यास्तव कृपा करून मला बरोबर न्यावें आणि युद्धावलोकन लालसा परिपूर्ण करावी. असें तिचें भाषण ऐकून, युद्धकथा ऐकावयासच योग्य, तें पाहणें मोठ्या विरांसही भयंकर इत्यादि अनेक प्रकार गोपालकृष्णानें तिला सांगितले. तरी ती हट्ट धरून बसली. तेव्हां कृष्णानें भौमासुराचें मृत्युबद्दल विचार केला आणि तो सत्यभामेच्या हातूनच मरणार आहे, असें मनांत आणून त्यानें तिलाही बरोबर घेतलें आणि चातुरंग दळभार सिद्ध करून दरकुच दर मुक्काम करीत जाऊन प्राग्ज्योतिषपूर गांठलें आणि त्याला वेढा दिला व एकदूत संदेश सांगण्याकरितां भौमासुराकडे पाठविला. त्यानें जाऊन त्यास (भौमासुरास) कळवितांच दैत्यानें आपलें सैन्य एकत्र केलें आणि रणस्तंभ ठोकून युद्धाचा आरंभ केला. यादवांचें आणि दैत्यांचें जेव्हां युद्ध होऊं लागलें, तेव्हां दोन्ही पक्षाकडील विर स्वपक्ष विजयेच्छेनें निकर करूं लागले; श-

स्त्रारुंचा वर्षाव होऊं लागल्यामुळें सूर्यमंडळही लोपून गेलें. रक्तमांसाचा चिखल झाला आणि रक्तनदी वाहूं लागली.

याप्रमाणें भयंकर युद्ध होत असतां भौमासुर आणि कृष्ण एकमेकांशीं लढूं लागले. दोघांसही जयाची इच्छा आणि दोघेंही पराक्रमी, मग कोणास कोण आटपणार ? शेवटीं अश्विन वद्य त्रयोदशीचे रात्रीं गोपालकृष्णाच्या कोमल वदनावर घर्मबिंदु आलेले आणि त्यास श्रम झालेले पाहून सत्यभामा त्यास ह्मणाली. "महाराज, आपण क्षणभर विश्रांति घेण्यासाठीं माझ्या हातांत जर धनुष्यबाण द्याल, तर या असुराबरोबर मीहि युद्ध करीन" असें ऐकतांच असुराचा मरणसमय समीप आला, असें जाणून गोपाल कृष्णानें धनुष्य तिचे हातांत दिलें आणि बाणभाता पाठीवर बांधून तिचें साह्य करूं लागले. हातांत धनुष्य घेतांच सत्यभामेनें भौमासुरास हांक मारली आणि आतां आपले प्राण वाचीव, असें बोलून बाणापाठीमागें बाण सोडूं लागली. तिचे हस्त चापल्य व युद्ध नैपुण्य पाहून भौमासूर थक्क झाला आणि वेड्यासारखा तिजकडे पहातच उभा राहिला. तरी जेव्हां प्रखर बाण त्याला लागूं लागले, तेव्हां त्यानेंही अनेक बाण सोडून तिच्या बाणांचें निवारण आरंभिलें. पण महिष मर्दनकालीं अष्टभूजा देवी जशी आरक्त नेत्र करून

दैत्यांचा संव्हार करीत होती, तशी सत्यभामा त्यास दिसूं लागली आणि आपला आयुष्योदधि संपला, असेंही त्यास वाटलें. तरी धैर्य धरून तो तिला ह्मणाला हे शृंगारवल्लरी, हे पिकस्वने, हे कोमलगात्रे, तुझें हस्तचापल्य पाहून मला फार संतोष झाला!! शाबास शाबास!!! अशी पराक्रमी स्त्री तूं या शस्त्रसंग्रामांत कष्ट करून मला मारण्याची इच्छा कां करितेस? अगे सुंदरी, तुझ्या योग्य रणभूमी ह्मटली तर कामोद्दीपक वस्तूंनीं शृंगारून सुशोभित केलेलें मंदीर होय. त्या मंदिरांत राहून एकच जर नेत्रकटाक्ष शर सोडशील, तर माझ्या सारख्या अनेक वीरांसह हतवीर्य करशील. असें तुझें सामर्थ्य असतां तुला हे श्रम कशाला पाहिजेत? चल, तुला युद्धच करण्याची इच्छा असेल, तर माझ्या पट्टराणीच्या मंदिरांत चल. ती तुझ्या दासीप्रमाणें तुझ्या आणि माझ्या सेवेंत तत्पर राहील, आणि मग तूं आपल्या पूर्ण इच्छेनें मजबरोबर रतीयुद्ध करून मला जिंक.

याप्रमाणें त्याची उद्धटभाषणें श्रवण करितांच सत्यभामेला पराकाष्टेचा राग आला. आणि तिनें धनुष्यावर तीक्ष्ण बाणाची योजना करून त्याचे र्‍हदयावर नेम धरून सोडला तो बाण सुटतांच पृथ्वी कंपायमान झाली, नक्षत्रें रिचूं लागली, दशदिशा धुंद झाल्या, आणि विज

पडल्याप्रमाणें कडकड ध्वनी होऊन तो बाण, जो आला तो भौमासुराचे हृदयविदारण करून पार निघून गेला. त्यामुळें जसा महावृक्ष उन्मळून पडतो, किंवा महापर्वताचा कडा कोसळतो तसा भौमासूर रथांतून उसळला तो भूमीवर पडला. असें होतांच देवांनीं विजयदुंदुभी वाजविल्या आणि जयघोषानें कृष्णानें सत्यभामेवर पुष्पवृष्टि केली.

भौमासुर रथाखालीं पडतांच कृष्णानें सत्यभामेचें आलिंगन चुंबन घेऊन तिला श्रमरहित केली. तों मरणोन्मुख झालेला भौमासुर सावध झाला आणि अंतीं कृष्णसत्यभामेचा स्तव करून कृतापराधाची क्षमा मागूं लागला तेव्हां भगवंतांनीं त्याचे सर्व अपराध क्षमा करून त्यास वर दिला तो असाः—

हे भौमासुरा, या नरकचतुर्दशीच्या आरंभीं माझ्या प्रियेनें तुझा वध केला आहे. यासाठीं आजपासून तुला नरकासुर असें ह्मणतील. आणि या तुझ्या मरणकालीं ह्मणजे चंद्रोदयकालीं जो स्नानाशिवाय राहील, तो नरकास जाईल. आणखी तुला असाही वर आहे कीं, या दिवशीं लोक तुझ्याप्रीत्यर्थ दीपोत्सव करतील. असें वर वाक्य श्रवण करितांच नरकासुरानें भगवंतासमक्ष प्राणत्याग करून भगवत्पदाचा अंगीकार केला.

नंतर गोपालकृष्णानें त्याचा पुत्र भगदत्त यास राज्यावर बसवून त्यानें (भौमासुरानें) हरण करून बंदींत ठेविलेल्या सोळाशें राजकन्या मुक्त केल्या आणि त्यांची आपणासच वरण्याची इच्छा आहे असें जाणून त्या सर्व द्वारकेस पाठविल्या. नंतर आदितीची किरीट कुंडलें घेऊन कृष्ण सत्यभामेसह इंद्रलोकीं गेला, आणि तेथून परत येतांना पारिजातक वृक्ष आणून तो सत्यभामेच्या दारांत लाविला.

याप्रमाणें नरकचतुर्दशीसंबंधीं पुरातन इतिहास आहे. शिवाय धनतेरस, नरकचतुर्दशी आणि अमावास्या (लक्ष्मी पूजन दिवाळी) या तीन दिवसांत वामनावतारी भगवंतानें बलीचें राज्य जिंकलें आणि इंद्राला दिलें, पण शेवटीं बलीनें भगवंताजवळून मागून घेतलेलें व तो ह्मणाला कीं तूं कपटरूपधारी असतांही मी आपलें वचन पूर्ण करण्याकरितां तुला सर्वस्व अर्पण केलें आहे. तरी तूं ह्मणतोस ह्मणून लोकोपकारास्तव असें मागतों कीं ज्याप्रमाणें माझे राज्यांत प्रजा आनंद करीत होती, त्याप्रमाणें या तीन दिवसांत तरी प्रजेनें (सर्वत्रांनीं) आनंदांत असावे* असें

* बलीचा मागण्याचा भावार्थ. जसा आपण दिवाळींत आनंद करितों त्याप्रमाणें बलीचे राज्य असतांना प्रजा सर्वदा आनंद करीत होती. अर्थात प्रजेला सदोदित असा खर्च करण्याची ऐपत होती, असें ह्मणावें लागतें.

ऐकतांच वामनरूपी भगवंतानें तथास्तु ह्मणून इंद्रास आज्ञा केली कीं, जशी बलीच्या राज्यांत प्रजा आनंद करीत आहे. तसा कोणाचेंही राज्य असलें तरी हे तीन दिवस बलिराज्याचें मानून प्रजेनें ( लोकांनीं ) आनंद करावा. आणि या तीन दिवसांस बलीराज्य असें ह्मणावें. ही भगवंताची आज्ञा जगत्रयास मान्य आहे, ह्मणून या दिवसांत हा आनंदाचा सण करणें अगदीं प्रशस्त आहे.

बलि आणि वामन यांच्या संबंधानें या दिवसांस बलिराज्य ह्मणायाचें आणि हा आनंदगजराचा सण करायाचा, असें मानलें तर त्या उभयतांच्या संबंधाचा इतिहास लोकांस समजणें अत्यावश्यक वाटेल. यास्तव आह्मीं त्यास दिवाळीचा इतिहास ( कथा ) असें ह्मणतों* आणि तोच इतिहास वाचकांकरितां खालीं लिहितों. नरकचतुर्दशीच्या संबंधानें जरी निराळी कथा दिली आहे. तरी तिचा ( त्या कथेचा ) संबंध इतर दिवसांस नाहीं पण नरकचतुर्दशीचा यांतही अर्थाअर्थी संबंध आहे. आणि याचसाठीं या कथेस दिवाळीची कथा असें ह्मटलें आहे.

*या कथेवरून असें समजावें कीं, दिवाळीच्या प्रत्येक दिवसांच्या कथा वेगळ्या नाहींत.

# दिवाळीची कथा.

भगवंतानीं नृसिंहावतार धरून हिरण्यकश्यपास मारिलें. त्याचा पुत्र महावैष्णव प्रऱ्हाद, त्याचा विरोचन आणि विरोचनाचा बलिराजा. हिरण्यकश्यपाचें कुळ प्रऱ्हादापासून वैष्णव झालें ( अर्थात् विष्णुभक्ति करूं लागले यावरून बलि वैष्णव होता असें समजावें. )

बलिराजानें भृग्वादिक ब्राह्मण बोलावून त्यांजकडून विश्वजित् यज्ञ करविला. त्या पुण्याईनें अग्नीनें प्रसन्न होऊन त्यास सुवर्णाचा रथ, अभेद्यचाप आणि अक्षय बाणभाता दिला. नंतर बलि त्या रथांत बसून इंद्रलोकीं गेला आणि देवांचा पराभव करून त्यानें (आपणच) इंद्राचें राज्य घेतलें. जेथें नंदनवनांत अप्सरांच्या नृत्य गायन सौख्यांत अमृतपान करून देव सौख्य भोगीत होते, तेथें त्यानें दैत्यांची स्थापना केली.

तेव्हा सर्व देव गिरिकंदरीं पळून गेले आणि गुरूस ( बृहस्पतिस ) विचारूं लागले. इंद्र ह्मणतो. गुरुवर्य, मी शंभर अश्वमेध करून इंद्रपद पावलों असें असतां तें बळीनें हरण केलें याचें कारण काय? असें ऐकतांच गुरु ह्मणतात. बलीनें महायोग साध्य केलेला आहे, शिवाय तो वैष्णव

असून त्यानें ब्राह्मणांची सेवा केली आहे. त्यांच्या आशीर्वादेंकरून अग्नीनें प्रसन्न होऊन त्यास रथ, चाप आणि बाण भाता दिला आहे. ह्मणून त्यानें तुमचा पराभव केला आहे. त्याजबरोबर युद्ध करून त्याचा पराभव करील असा वीर मला त्रैलोक्यांतही कोणी दिसत नाहीं. तर आतां तुह्मीं दैवावर भार ठेऊन पर्वतदरींत स्वस्थ असा. जेव्हां तुह्माला दैव अनुकूल होईल तेव्हां अधिकार गेले आहेत ते परत मिळतील.

असें ऐकून देव इच्छितरूपें धरून चोहोंकडे भ्रमण करूं लागले. विप्रवरानें संतुष्ट झालेला बलि आपणांस धन्य मानून त्रैलोक्याची राज्यलक्ष्मी एकटा उपभोगूं लागला. त्याच्या दातृत्वानें जगांत दरिद्री असा नांवालाहि राहिला नाहीं. पण देवांच्या पदच्युतीमुळें देवमाता अदिती फार दुःखीत झाली आणि पतीची (कश्यपऋषीची) प्रार्थना करून ह्मणूं लागली. महाराज, इंद्रादिक जे माझे पुत्र, त्यांस दितीच्या पुत्रांनीं पदच्युत केलें आहे त्यांचे दुःख मला पहावत नाहीं. तर कृपा करून बलीला जिंकील असा पुत्र मला द्यावा. असें ऐकून महा विचारी कश्यप हांस्य करून ह्मणाला. परमात्म्याची माया कशी स्वेच्छेनें क्रीडा करीत आहे पहा. हा मिथ्या प्रपंच जाणत असतांही मनुष्यांस पतिपुत्रादिकांचा मोह सुटत नाहीं. याला

ह्मणावें तरी काय ? हा प्रपंच कोणाचे सत्तेनें रात्रंदिवस चा॰ लत आहे ? याचा कोणीच विचार करून पहात नाहींत. असो, कांते, जर तूं जगदात्म्या परपुरुषाला शरण जा- शील, तर तुझी मनकामना पूर्ण होईल. वासुदेवाचें ध्यान करून पयोव्रत कर, ह्मणजे तोच तुला प्रतापी पुत्र देईल. असें ऐकतांच अदितीनें त्या व्रताचा विधि विचारला. तेव्हां कश्यप सांगतात.

फाल्गुन शुद्ध द्वादशीस उषःकालीं उठून गंगास्नान करावें आणि व्रतसंकल्प करून श्रीहरीची पूजा करावी. नंतर तूप, गूळ घालून पायस करावें आणि त्याचा नैवेद्य दाखवून अग्नींत नारायणप्रीत्यर्थ अष्टोत्तर शत आहुती द्याव्या. नंतर हुतशेष आपण भक्षण करावें. याप्रमाणें बारा दिवसांत व्रत समाप्त करावें. ह्मणजे सुंदर, मनोहर, आणि पराक्रमी असा पुत्र परमेश्वर तुला देऊन इच्छित मनोरथ पूर्ण करील. असें ऐकतांच अदितीनें बारा दिवस यथासांग व्रत केलें. तेव्हां बाराव्या दिवशीं प्रत्यक्ष भगवान प्रसन्न हो- ऊन शामसुंदर, पीतांबरधारी मनोहर मूर्ति अदितीपुढें उभी राहिली. त्यांस पाहतांच अदितीनें नानाप्रकारें करून त्यां- ची स्तुति केली. तेव्हां भगवान ह्मणतात.

हे अदिती, कोणत्या हेतूनें हे पयोव्रत करून मला संतोषविलेंस हें सांग. तुझ्या सर्व वासना मी परिपूर्ण करीन

असें ऐकतांच देवमातेनें बलीचें वर्तमान सांगून त्यास जिंकणारा पुत्र मागितला. तेव्हां भगवान ह्मणाले-मीच तुझ्या उदरीं अवतार घेऊन बलीला जिंकीन व इंद्राला राज्य देईन. असें सांगून अंतर्धान पावल्यावर अदिती पतिचरणीं भाव ठेवून राहिली असतां गर्भवती झाली. तो गर्भ जसजसा वाढूं लागला, तसतसा कश्यपाश्रमांत सुवास सुटूं लागला आणि त्याचा प्रकाशही पडूं लागला, अदिती फारच शोभायमान दिसूं लागली, प्रसूतीकाळ सन्निध येतांच ब्रह्मदेवांनीं गर्भस्तुति केली, दशदिशा प्रसन्न झाल्या, आणि चोहोंकडे आनंद झाला. नंतर भाद्रपद शुद्ध द्वादशीस श्रवण नक्षत्रावर अभिजित् मुहूर्तावर भगवंतानीं अवतार धारण केला! त्या वेळेस कश्यपऋषींनें आनंदोत्साह केला, देवांनीं पुष्पवृष्टी केली, गंधर्व आणि अप्सरा नृत्य गायन करूं लागल्या. बटुवामनाचें रूप पाहून कश्यपानें अनेक ऋषिगणांकडून जातक वर्णविलें. नंतर कांहीं काळ गेल्यावर कश्यपांनीं व्रतबंध विधीस आरंभ केला. त्या वेळेस प्रत्यक्ष सूर्यानें येऊन त्यास गायत्री मंत्राचा उपदेश केला. बृहस्पतीनें यज्ञोपवित, कश्यपानें कौपीन, पृथ्वीनें कृष्णाजिन, चंद्रानें पळसाचा दंड, सप्तऋषींनीं दर्भ, सरस्वतीनें रुद्राक्षमाला, कुबेरानें भीक्षापात्र दिलें आणि पार्वतीनें भीक्षा वा-

ढली. त्या वेळेस बटु वामनाचे रूप फार शोभायमान दिसूं लागले. नंतर देवांच्या कैवारास्तव भगवंत तींच आयुधे धारण करून ज्या ठिकाणीं नर्मदा तटाकावर बलि यज्ञ करीत होता त्या ठिकाणीं गेले.

त्यांस पाहतांच बलीनें आदरातिथ्य करून आसनावर बसविले आणि हात जोडून त्यांचे पुढे उभा राहिला आणि ह्मणाला. महाराज आपल्या आगमनेकरून आज माझा यज्ञमंडप पवित्र झाला, माझे जन्म सफल झाले, आणि केलेल्या कर्मबिजांस अखंड अंकूर उद्भवले, असे मी समजतों. तर इच्छित वस्तु मागा. आपणांस धेनु, कांचन, आश्रमास जागा किंवा यज्ञाकरितां द्रव्य इत्यादि जे पाहिजे ते मागून घ्या. आपली जी इच्छा असेल ती परिपूर्ण करावी, अशी मला उत्कंठा लागली आहे. तर कृपा करून. आज्ञा करावी.

असे विनयपूर्वक भाषण ऐकतांच वामन ह्मणतो. हे बलिराजा, तुझे पूर्वज महापराक्रमी, उदार, सत्यप्रतिज्ञ आणि दानशूर व विष्णुभक्त होते. ह्मणून त्यांचे वंश या जगांत नांदत आहे. आणि दानशूरत्वाविषयीं तुझी ही ख्याती आहे. अशांतच तुझी कीर्ति दिगंतरास न्यावी, असा धरूनहेतु आलों आहे. तर मला त्रिपाद पृथ्वीचे दान दे.

ह्मणजे त्या भूमींत स्नानसंध्या करून तुझें अभीष्टचिंतीत राहीन. असे ऐकतांच दैत्यराज ह्मणतो–हे बटो, तुझें रूप पाहून मी प्रसन्न झालों आहे, ह्मणून विनंती करितो कीं, जें देणें मला शोभेल, असेंच कांहीं आणखी माग; तुला भूमी देश. ग्राम, वृत्ति, सुवर्ण, धेनु, रथ आणि गृहस्थाश्रमा साठीं गुणवती वधू शोधून देतों. हें सर्व सोडून भलतेच काय-मागतोस? तुझ्या सारख्या बटु वामनाला मी त्रिपाद भू दान देणें ह्मणजे फारच लाजिरवाणी गोष्ट आहे. असें ऐकतांच वामन ह्मणाला. हे राजा, न्याय पाहतां ज्याला त्रि. पादभूमीनें संतोष होणार नाहीं, त्याला ही सप्तद्वीपावसुमती जरी दिलीस, तरी इच्छा पूर्ण होणार नाहीं. यास्तव मी जे अल्पदान मागितलें, तेवढेंच मला दे. पूर्वी गय, पृथु इत्यादि सार्वभौम झाले होते, तरी त्यांसही तृष्णेनें सोडिलें नाहीं. तर मी त्रिपादभूमींतच संतुष्ट आहे मला तेवढीच दे ह्मणजे झालें. असे ऐकतांच बलीनें संकल्प केला आणि झारी हातांत घेऊन वामनाचे हातावर दानोदक घालूं लागला तों शुक्र घाई घाईनें बळीजवळ आला आणि बोलूं लागला–राजा, अरे या ब्राह्मणाला दान देऊं नको. हा महाविष्णु ब्राह्मण रूप धरून तुझें वैभव हरण करण्याकरितां आला आहे. यानें तुझी संपत्ती हरणकेल्यावर मग तूं कोणाचे

दारीं जाशील! या गोष्टीची मला फार काळजी आहे. तर धर्मशास्त्राप्रमाणें जरी दान करणें झालें, तरी दशांश ठेऊन दान करावें. ही धर्म मर्यादा तरी उल्लंघन करूं नको. याप्रमाणें शुक्रानें जरी त्याचा निषेध केला, तरी बलिराज त्यास ह्मणाला. अहो गुरुवर्य, आपण सर्वज्ञ आहां, तरी सूचना करितों. दान संकल्पकेल्यावर दात्यानें मागें फिरूं नये. संकल्पित दानापासून दाता जर परांवृत्त झाला, तर त्यास रौरवनरक प्राप्त होत असतो. ह्मणून जरी मी राज्यभ्रष्ट झालों, तरी चिंता नाहीं. पूर्वीं हरिश्चंद्र, नळ, शिबि, आणि दधीची इत्यादिकांनीं सत्व सोडलें नाहीं, ह्मणूनच त्यांची कीर्ति झाली. हें आपण जाणत असतांही जर मला असा उपदेश कराल, तर माझा नाइलाज आहे. शिवाय प्रत्यक्ष भगवान् विप्ररूप धरून जर मजपाशीं दान मागत आहे, तर मी तें अवश्य दिलेंच पाहिजे.

याप्रमाणें बलीचें निश्चयपूर्वक भाषण ऐकतांच शुक्राचार्यास खिन्नत्व आणि क्रोध प्राप्त झाला आणि 'तूं राज्यभ्रष्ट होशील' असा त्याने बलिस शाप दिला. तरी आपल्या शिष्यकुलाचे कल्याण स्मरून त्यानें त्या झारीचे छिद्रांत प्रवेश करून दानोदक हातावर पडण्यास अवरोध केला. झारींतून दानोदक पडत नाहीं, असें पाहतांच सर्वज्ञ

भगवंताने एक दर्भ घेऊन झारीच्या छिद्रांत घालतांच शुक्राचार्याने ज्या ठिकाणीं आपला नेत्र लाविला होता तो फुटला ! आणि दानोदक वामनाच्या हातावर पडले. त्या वेळेस बलीचे दातृत्व पाहून आकाशस्थ देवांनीं पुष्पवृष्टी केली. सर्व देव ह्मणूं लागले कीं, बलीने दानशूरत्वाची कीर्ति अजरामर केली.

असो दानमूर्तीचे वेळीं बटुवामनानें रूप इतके वाढविलें कीं, त्याचे मस्तक आकाशास भेदून वर गेलें, हात दश दिशा व्यापून राहिले, सप्तसागर उदरांत राहिले, आणि सर्व देवतामय भगवंताचे विराट शरीर दिसूं लागले. त्या वेळेस सर्व ऋषी आश्चर्य करूं लागले. शंख, चक्र, गदा, पद्म, इत्यादि आयुधे धारण करणारा अलंकारानीं मंडित, अशा त्या भगवद्रूपानें एकपदें करून सर्व पृथ्वी घेतली आणि दुसऱ्या पदाने आकाश व्याप्त केलें. त्या विराटरूपी भगवंतास पाहतांच देव, हा आमचा कैवारी, असे ह्मणून त्याचे स्तवन करूं लागले. ज्या पदाने आकाश व्याप्त केले, ते भगवत्पद ब्रह्मांड फोडून वर जातांच सप्तऋषि प्रमुख सर्वांनीं त्याची पूजा केली. इकडे सर्व दैत्य शस्त्रास्त्रे करून वामनाबरोबर युद्ध करण्यास तयार झाले.

तेव्हां बळीने त्यांस सांगितले. जर माझी आज्ञा तुह्माला मान्य असेल, तर पुनः काल अनुकूल होईपर्यंत पाताळीं जाऊन स्वस्थ रहा. असे ऐकतांच दैत्य निघून गेले; नंतर गरुडाने वरुणपाश आणून भगवंताच्या इच्छेप्रमाणे बळीस बंधन केले. त्या वेळेस सर्व ऋत्विज आणि बलिराजाची प्रजा हाहाःकार करूं लागली वामन बलीस ह्मणाला, हे राजा दोन पदे भूमी, मी भरून पावलो, आणखी एक पदाची व्यवस्था काय करतोस ते सांग जरी बळीला कपटानेच जिंकले होते व वरुन पाशांनीं बांधले होते; तरी तो सत्वाधीर आपले वचन पाळण्यासाठीं भगवंतास हात जोडून ह्मणाला. हे देवाधीदेवा, हे माझे शरीर पृथ्व्यंशच आहे; तर तिसरा पद माझ्या मस्तकावर ठेवावा. असें ऐकतांच भगवान त्यास प्रसन्न झाला. इतक्यांत त्या ठिकाणीं प्र्हाद प्राप्त झाला आणि बलि बंधन पाहून भगवंतास ह्मणाला. हे भगवान, हे हृषीकेशा, आतां माझी विनंती श्रवण कर. तूं बलीचें सर्वस्व हरण केलेंस, त्या योगानें मला संतोष झाला आहे. आणि या माझ्या कुलदीपकावर तूं पूर्ण अनुग्रहच केलास असें मी समजतों. माझा हा वंश धन्य झाला इतक्यांत बलिपत्नी विंध्यावली येऊन भगवंताचा स्तव करूं लागली. तों ब्रह्मदेवांनीं येऊन बलिस

बंधनापासून मुक्त केलें. नंतर भगवंतानीं बलीची मुतळी स्थापना करून स्वतः त्याचे वामनरूपी- द्वारपाळ झाले आणि सर्व राज्य इंद्राचें हवाली करतेवेळेस मागें लिहिल्या प्रमाणें बलीचा आणि वामनाचा संवाद झाल्यावर हा दिवाळीचा सण करण्याची चाल पडली. बलिबंधन अश्विन वद्य त्रयोदशीस झालें व त्या दिवसांपासून तीन दिवसांत देवता आपापल्या स्थानापन्न झाल्या. आमावास्येच्या दिवशीं बलीच्या बंदिशाळेंतून मुक्त होऊन लक्ष्मी क्षीरसागरीं जाऊन स्वस्थ झाली. ह्मणून त्या दिवशीं लक्ष्मी पूजन करण्याची चाल पडली आहे. चतुर्दशी, अमावास्या आणि प्रतिपदा, हे तीन दिवस बलिराज्याचे मानण्याची चाल तेव्हांपासून जी पडली आहे, ती अजून चालत आहे.

---

# भाऊबिजेची कथा.

यम ( मनुष्याचे जीव हरण करून कर्मानुरूप सद्गति किंवा दुर्गती देणारा देव ) आणि यमुना ( मथुरेजवळ जी नदी आहे ती ) हीं उभयतां भावंडे होत. यांचा पिता सूर्य. दोघेही अल्पवयस्क असतां एके ठिकाणीं असत, पण जेव्हां यमास दक्षिणेचे राज्य मिळालें आणि यमुनाही

आपल्या पतीकडे गेली, तेव्हां उभयतांचा अर्थातच वियोग झाला. त्यानंतर कांहीं कालानें यमुनेस आपल्या भावाची आठवण झाली. पण ती पतीचे आधीन असल्यामुळें तिला आपल्या भावाच्या भेटीस जाववेना; ह्मणून तिनें यमासच आपल्या घरीं बोलाविलें. या बोलावण्या बरोबर यमानें आपल्या बहिणीच्या भेटीस जावें; परंतु तो आपल्या अधिकारावर असल्यामुळें त्याच्यानेंही काम सोडून तिजकडे जाववेना. असा नडीचा प्रकार झाल्यामुळें त्या दोघांत अतिशय प्रेम असतांही त्यांची भेट होईना. यमुना वरचेवर त्यास निरोप पाठवीतच असे आणि यम 'येईन' असें वरचेवर सांगून पाठवी. असा बहुत काळ गेल्यावर एक वेळ यमासच कांहीं कामानिमित्त यमुनातिरीं यावें लागलें आणि 'जातांना बहिणीस भेटून जावें' असें मनांत आणून तो तिजकडे गेला. बंधूस पाहतांच यमुनेस अत्यानंद झाला, आणि तिनें आपल्या भावाचा पूजा सत्कार व त्यास मंगलारती करून गौरविलें आणि मिष्टान्न भोजन देऊन वस्त्रालंकारही अर्पण केले; त्याचप्रमाणें यमानेंही बहिणीचा वस्त्रालंकारीं गौरव आणि पूजा सत्कार केला. हा प्रकार ज्या दिवशीं घडला, तो कार्तिक शुद्ध द्वितीयेचा दिवस होता, ह्मणून त्या दिवसापासून कार्तिक शुद्ध द्वितीं-

येस भाऊबीज असें ह्मणतात. यमानें आपल्या बहिणीस भेटून त्या दिवशीं तिचा पूजा सत्कार केला आणि यमुनेनेंही त्यास गौरविलें, यावरून या द्वितीयेस जे बंधु भगिनींचा व भगीनी बंधूंचा पूजा सत्कार करतील त्यांस नरकाचे भय राहणार नाहीं. व भावंडांत आयुष्य, सौख्य इत्यादिकांची वृद्धि होईल. असें यम धर्मराजानें वरदान दिलें आहे.

---

# दीपवाळी रंजन.

## प्रकरण ३ रें.

## अभ्यंग स्नानविधि.

आह्मीं प्रथम प्रकरणांत सांगितलेंच आहे कीं, आमच्या शास्त्रकर्त्यांनीं जे जे नियम केले आहेत; त्यांत मनुष्याचा शरीरिक उपयोग ही वैद्यकाला अनुसरून गर्भित आहे. त्याप्रमाणें दिवाळीचे दिवसांत अंगास सुवासिक तेलें व उटणीं लावणें व उष्णोदकानें स्नान करणें हा नियम आहे यांत घामानें किंवा इतर अनेक कारणानें मलीन झालेल्या शरीरास मृदुता यावी व पुढें येणाऱ्या सीतकालांत त्याचा योग्य उपयोग होऊन थंडीनें अंगें फुटतात, त्यास प्रतिबंध

व्हावा, हा गर्भितार्थ आहे. तर अशा उपयुक्त नियमाला वेडगळपणा ह्मणणारांची अक्कल किती असावी हें उघड होत आहे. आतां कोणी ह्मणेल ह्याच दिवसांत उटणीं व तेलें लाविल्या पेक्षां जर नित्यच लावीत गेलों तर याहून ही फायदाच होणार नाहीं काय? तर त्यांस उत्तर असें कीं आपले शास्त्रकर्ते फार दूरदर्शी होते; त्यांस कलींत हिंदु प्रजेचे कसे हाल होतील? हें समजलें होतें, ह्मणून त्यांनीं हा प्रकार धर्म संबंधांत गोवून ठेविला नाहीं तर परवशतेमुळें दरिद्री झालेल्या लोकांच्या शरीरांस बाराही महिन्यांत मंगल स्नान मिळालें नसते. आपल्या शारिरीक व मानसिक सुखास आवश्यक अशा क्रिया जर धर्मशास्त्राचे बंधनांत नसत्या, तर या निकृष्ट दिवसांत त्या आपल्या हातून-खर्चाच्या तंगीमुळें कधींही घडल्या नसत्या. फार कशाला या दिवाळीच्या सणाला जर धर्म बंधन नसतें, तर आज पावसाळा जातांच घराची डागडुजी करून त्यांस चुनालावणें रंगाविणें, इत्यादि शरीर सुखाची कृत्यें आपल्या लोकांकडून नियमित पणाणें झाली नसती सारांश आमच्या धर्मशास्त्रकारांनीं आमची कींव करून आमच्या खऱ्या सुखाची साधनें धर्म प्रकरणांतच जर बांधून ठेवली नसती, तर आज आमचे काय झालें असतें, हें सांगवत नाहीं!!

नरक चतुर्दशीच्या पाहटेस अभ्यंग स्नान करणें वगैरे प्रथम भागांत लिहिलेच आहे. तदनुरूप कित्येक दुकानदार उटणीं, तेलें, इत्यादिकांची दुकानें मांडून बसतातच तरी ज्यास आपल्या हातानें सुगंधी सामान तयार करण्याची होस असेल त्यांच्यासाठीं कित्येक रीति खालीं दिल्या आहेत.

## प्रकार पहिला.

| | | | |
|---|---|---|---|
| नागरमोथा | १ भाग | हर्डे | ४ भाग. |
| शिलारस | ५ भाग | नखला | ९ भाग. |

कोष्ट, लोहबाण आणि कापूर हीं प्रत्येक दोन दोन भाग हे सर्व पदार्थ एकत्र कुटून पाण्यांत कालवून आंगास लावून स्नान करावें ह्मणजे आंगास चांगला सुवास येतो.

## प्रकार दुसरा.

| | |
|---|---|
| नखला | नागरमोथा. |
| हरडा | जटामांसी. |
| बेखंड | शोफ. |
| करंजाचे बीं | कापूर. |
| अगर | लोहबाण. |
| कस्तुरी | चंदन. |
| सोनकेवड्याचें पाणी | २ भाग. |

हीं प्रत्येक तीन तीन भाग.

हे सर्व पदार्थ एकत्र वाटून आंगास लावावे. ह्मणजे अंगास सर्वोत्कृष्ट सुगंध येतो. हें उटणे फारच सुगंधी असल्या मुळें यास सुगंधगर्भा असें ह्मणतात.

## प्रकार तिसरा.

| | |
|---|---|
| कस्तुरी | कण्हेरीचें मूळ. |
| नागकेशर | जायफळ. |
| शिलारस | लोबाण. |
| नागरमोथा | कापूर. |

हे सर्व पदार्थ समभाग घेऊन निरनिराळे कुटून बारीक वस्त्रगाळ पूड करावी आणि ती विड्याचे पानाच्या (नागवेलीचे रसांत कालवून तें उटणें आंगास लाविलें असतां शरीरास उत्तम सुवास येतो.

## प्रकार चवथा.

| | |
|---|---|
| कल्मी दालचिनी | नागरमोथा. |
| वेलदोड्याचे दाणे | जायपत्री. |
| शेवग्याच्या बिया | वाळा. |

कचोरा.

हे सर्व पदार्थ समभाग वाटून पाण्यांत कालवून आंगास लावावे ह्मणजे आंगास चांगला वास येईल.

### प्रकार पांचवा.

काळा वाळा
नागरमोथा
लोहोबाण
जटामांसी
आगर
लोद्र
कापूर
चंदन

हे सर्व पदार्थ समभाग घेऊन त्यांचें उटणें आंगास लाविलें असतां आंगास सुवास उत्तम येतो.

### प्रकार सहावा.

आवळकांठी
बाळहिरडा
सोनकेवडा
नागरमोथा.
जटामांसी.
वाळा.

हे पदार्थ समभाग घेऊन त्यांचें उटणें आंगास लावून स्नान करावें, ह्मणजे आंगास व केसांस उत्तम सुवास येतो.

### प्रकार सातवा.

वेलची दाणे
नागरमोथा
सोनकेवडा
तमाल पत्र
जटामांसी.
कचोरा.
नखला.
वाळा.

हे सर्व पदार्थ समभाग घेऊन त्यांचें उटणें आंगास लावून स्नान केलें असतां बरेच दिवसपर्यंत केसांस व आंगास सुवास येतो.

प्रकार आठवा.

| | |
|---|---|
| तमाल पत्र | चंदन. |
| काळा वाळा | वाळा, |
| कृष्णागरू | नागरमोथा. |

ह्या समभाग पदार्थांचें उटणें आंगास लाविलें असतां उत्तम सुवास येतो.

---

# दिपवाळी रंजन.

मिष्टान्न भोजन

म्हणजे

## नानाप्रकारची पक्वानें करण्याची माहिती.

प्रकरण ४ थें.

दिवाळीच्या सणांत शास्त्र नित्य मिष्टान्न भोजनाची आज्ञा देतें, ह्मणून मिष्टान्न, रुचिकर अशी पक्वानें करून भक्षण करण्याची चाल आहे. श्रीमान् आणि दरिद्री या उभयवर्गांतही याबद्दल शक्त्यनुरूप खर्च होत असतो. ह्मणून सर्वांस उपयोगी पडेल अशी माहिती देणें हें आ-

मचें कर्तव्य आहे. श्रीमंतात घिवर, मांडे, जिलबी, बुंदी, मोतिचूर, बेसन दळिया, श्रीखंड, बासुंदी, इत्यादि आणि गरीबांत करंजा, अनरसे, कोडबुळी, पुरण, गुळाची पोळी, इत्यादि खालच्या प्रतीची पक्वानें करितात. यासाठीं व्यर्थ शाक भाज्या किंवा चटण्या कोशिंबिरी न सांगतां फक्त पक्वान्नांबद्दलचीच माहिती देतों.

गहू, हरबरें, तांदुळ, दूध, दहीं आणि साखर हीं बहुतकरून सर्व श्रेष्ठ पक्वान्नांची मुख्य द्रव्यें आहेत. आणि उडीद, जिरें, धने आदिकरून मसाल्याचे योगानेंच थोड्या खर्चांत वरील (हरबरे, तांदुळ) द्रव्यांपासूनच हलक्या प्रतीचीही पक्वान्नें होत असतात. ह्मणून पक्वान्नांचीं जीं मुख्य मुख्य द्रव्यें आहेत, त्यांचे वैद्यकास अनुसरून गुणदोष कथन अप्रासंगिक होणार नाहीं. ह्मणून आधीं तो विचार करून पुढें पक्वानें सांगण्यांत येतील.

गहूं–स्निग्ध, सीत, जड, धातुवर्धक, बलकर, कफकर, सारक, भग्नसंधाकर, आमकर, आणि वायु व पित्त यांचे नाशक आहेत. हेच जर जुने असले तर कफ करीत नाहींत. असे समजावे.

हरबरे–वातकर, सीत, निरस, विष्टंभकारक, रुचिकर, वर्णकर, बलकर, अध्यानकारक, आणि ज्वर, रक्तपित्त,

रक्तदोष, आणि पित्त, यांचा नाश करितात. हे सर्व गुण सालीसुद्धां हरबऱ्यांचे आहेत. डाळ किंचित् वायूला कोपविणारी, रुचिकर, दीपन आणि कफाचा नाश करणारी आहे.

तांदूळ–रुचिकर, शुक्रवर्धक, जड, सीत, आणि कफ, क्षय आणि वायू, यांचा नाश करितात. साखर भात, पौष्टिक धातुवर्धक, वातनाशक आणि कफहारक असा आहे. पेज काढलेला भात सर्व गुणांनीं श्रेष्ठ होय.

दूध–गाईचें रुचिकर, स्निग्ध, बलकर, असें असून बुद्धि, ज्ञान, वीर्य, शुक्र, कफ, आणि पुष्टी यांस वाढविणारें आहे शिवाय रसायनी, पुरुषत्वप्रद, जड, आणि वातविष, वातरक्त, रक्तपित्त, दाह, मनोव्यथा, जीर्णज्वर, शोष, अपस्मार, पांडुरोग, शूल, आम्लपित्त, क्षय, गर्भपात, योनिरोग, अतिसार, उदावर्त, भ्रम, खोकला, मद, व नेत्ररोग यांचा नाश करणारें आहे.

ह्मशीचें दूध–रुचिकर, पौष्टिक, स्निग्ध, जड, आणि वीर्य वृद्धिकर असें असून निद्रा, कफ व आळस यांची वृद्धी करणारें आहे, आणि श्रमाचा नाश करणारें आहे. शेळीचें दूत शीत, ग्राहक, आणि क्षय, खोकला, रक्तपित्त, सर्व ज्वर, व्याधि आणि अतिसार यांचा नाश करितें.

दहीं–गाईचें रुचिकर, पौष्टिक, स्निग्ध, दीपक, शीत, बलकर, आणि वातार्शनाशक असें आहे. म्हशीचे–स्निग्ध, बलकर, कफकर, वीर्यवृद्धिकर, शुक्रकर, जड, आणि वात, पित्त व श्रम यांचा नाश करितें. शेळीचें–पाचक रुचिकर, दीपन, उष्ण, आणि खोकला, क्षय, मूळव्याध, श्वास, त्रिदोष, आणि वायू यांचा नाश करणारें आहे.

तूप–सर्व प्रकारें साधारण वीर्यवृद्धिकर, कांतिकर, धातुवर्धक, नेत्रांस हितकारक, दीपक, जड, कफकर, असें असून बुद्धि, ज्ञान, स्मृति, तेज, बल, आणि पुष्टी देणारें आणि मदकर आहे. आणि अजीर्ण, उन्माद, शूल, क्षय, उदावर्त, रक्तपित्त, रक्तदोष वातपित्त, दाह, योनिरोग, नेत्र, कर्ण, व मस्तक संबंधीं रोग, सूज, आणि त्रिदोष यांचा नाश करितें. यांत म्हशीचे विशेष कफकर आहे, आणि गाईचें व शेळीचे हे कफकर नसून गुणांनीं श्रेष्ठ आहे. अग्निमांद्य, क्षय, आमव्याधी, कफरोग, मद, ज्वर' यांजवर आणि बालवृद्ध यांस तूप अल्प द्यावें तूप जितकें जुनें असेल तितकें व्रण भरून काढण्यास श्रेष्ठ जाणावें.

साखरेचा पाक करण्याची रीति–कढईंत एक शेर साखर व पावशेर पाणी घालून ती चुलीवर ठेवावी. आणि खालीं जाळ लावावा. नंतर कांहीं वेळानें त्या साखरेस

उकळी आली, ह्मणजे तीवर दूध शिंपावें. ह्मणजे साखरें-
तील मळ वर येईल. तो झाऱ्यानें काढून टाकावा असें
वारंवार करून सर्व मळ काढावा. व पाकाला तार येईप-
र्यंत कढवून उतरावा. हाच पाक वाळविल्यावर धुवा सा-
खर तयार होते.

याप्रमाणें प्रत्येक द्रव्यांत कांहीं गुण व कांहीं दोष
आहेतच पण जर त्या सर्वांचें वर्णन करूं लागलों तर ग्रंथ
विस्तार फार होईल. ह्मणून वाचकांस मासल्यासाठीं मु-
ख्यपदार्थ दाखविले आहेत. आतां पक्वान्नांविषयीं सांगतों.

घीवर— चांगला गव्हाचा रवा एकशेर घेऊन त्यास
पावशेर तूप चोळावें नंतर त्यावर अर्धाशेर निरसें दूध शिं-
पून दोहों हातांनीं चोळावा, आणि कांहीं वेळ दडपून
ठेवावा. नंतर कल्हई लावलेली एक परात घेऊन त्यांत
एक बचकभर तो रवा घेऊन त्यांत दूध घालून ते दोन्हीं
पदार्थ, परातीला तळ हात चिकटेपर्यंत फेंसावें ( तळ हा-
ताखालीं कोणताही पदार्थ घेऊन त्यांत दुसरा प्रवाही प-
दार्थ घालून परातभर सारविणें याला फेंसणें असें ह्मण-
तात. ) याप्रमाणें सर्व रवा फेंसून झाल्यावर घीवरपात्र
चुलीवर ठेवावें. तें असें कीं, तूप पात्राबाहेर आलें तरी
चुलींत जाऊं नये, ह्मणून त्या पात्राचे व चुलीचे कांठ मा-

तीने लिंपून काढावे. नंतर अर्धे पात्र भरे इतके तूप त्यांत घालून खालीं मंद जाळ लावावा. तूप तापल्यावर एका लोटक्यांत फेसून ठेवलेला पदार्थ पावशेर घेऊन ते लोटकें तूपाजवळ हात नेऊन एकसारखे ओतीत ओतीत हातभर उंच न्यावे ( ओततांना लोटक्यांतील तृतीयांशच तुपांत पडण्याबद्दल जपावे ) या वेळीं तूप दरदरून वर येऊं लागते. तेव्हां घीवर ओतण्याचे बंद करावे ह्मणजे तूप खालीं बसेल. नंतर पुनः पूर्वीप्रमाणे ओतावे व तूप वर येऊं लागले ह्मणजे बंद करावें ( या वेळेस लोटक्यांतील एक भाग. ह्मणजे पूर्वी त्रितीयांश ओतले असेल त्यांतील अर्धे ओतावे. व अर्धे राहूं द्यावे ) तिसऱ्यानेही पूर्ववत करावे आणि तूप खालीं बसल्यावर झाऱ्यानें घीवर हळूच परतावा. नंतर अदमासाने तो पक्व झालेला समजून झाऱ्यानेच बाहेर काढावा आणि पूर्वी तयार करून ठेविलेल्या साखरेच्या पाकांत बुडवावा, ह्मणजे तयार झाला असेच सर्व करावे.

नारळाचा घीवर—गव्हांच्या रव्यांत साखर व ओल्या नारळाचा कीस आणि दूध घालून वर सांगितल्याप्रमाणें पुष्कळ फेसून नंतर तुपांत ओतणें वगैरे वरील रीतिप्रमाणें करावें.

रव्याचा घीवर-रव्यांत साखर घालून फेंसून त्याचा घीवर करून हलक्या जाळावर थोड्या तुपांत तळावा. याचेंच नांव दुधाचा घीवर.

चिरोटे-गव्हांचे रव्यास पाण्यांत भिजवून एक तास ठेवावे नंतर तो रवा पाट्यावर कुटून मऊ करावा. मग त्या पिठाचे लिंबाएवढें गोळे करून ते परातींत ओल्या वस्त्राखालीं झांकून ठेवावे. मग त्या गोळ्यास सपीट लाऊन पापडाहून पातळ पुरी लाटावी. अशा तीन किंवा चार पांच पुऱ्या लाटल्यावर त्या प्रत्येकीस तूप लावावें आणि त्या एकावर एक ठेऊन त्यांची घडी करावी. व तीन बोटें रुंदीची पटी करून, तिचे सुरीनें चौकोनी तुकडे करून, पुनः लाटून, तुपांत तळून बाहेर काढतांच त्यावर साखर पसरावी.


मालपुवा-गव्हाचा रवा एकशेर घेऊन त्यासछटाक तुप चोळावें नंतर अर्धाशेर निरसें दुध त्यांत घालून पाण्यांत मळावें व थोडा वेळ ठेवावें. नंतर पाट्यावर कुटून तो रवा अगदीं मऊ करावा. नंतर त्याच्या लिंबा एवढाल्या गोळ्या करून पिठींत घोळून पोळपाटावर पातळ लाटून ठेवाव्या. नंतर साखर किसलेलें खोबरें व वेलदोड्यांचा पूड एकत्र करून ठेवावी, आणि चुलीवर तवा ठे-

वून त्या खालीं बेताचा जाळ लावावा, व थोडें तूप तव्यावर टाकून लाटलेल्यापैकीं एक पुरी त्या तुपावर ठेवावी. नंतर साखर, कीस, वगैरे जें जें पुरण तयार करून ठेविलें असेल, त्यांतून चिमटीभर घेऊन तव्यावर न पाडतां त्यावरील पुरीवर पसरावें आणि त्यावर दुसरी पुरी ठेऊन बेतानें दोन्हीं पुऱ्या परताव्या. नंतर पसरलेल्या बाजूवर पुनः पूर्ववत् पुरण पसरून त्यावर तिसरी पुरी ठेवावी. आणि युक्तीनें दुसऱ्या बाजूस परतावें आणि तिजवर किंचित् तूप टाकून पुन. पुरण पसरावें व पुरी वर ठेवावी. याप्रमाणें चार पांच पुऱ्यांचा थर देऊन तळून काढाव्या.

जिलबी—अर्धाशेर रवा आणि अर्धाशेर मैदा मिसळून त्यास अर्धा पाव तुपाचें मोहन चोळून, मग अर्धापाव दहीं लावावें. नंतर भजांच्या पिठासारखें पाण्यांत कालवून एक रात्र ठेवावें. दुसरें दिवशीं तें पीठ परातींत घेऊन तार येईपर्यंत खूप फेंसावें, आणि एके भांड्यांत भरून ठेवावें. नंतर एकशेर साखरेचा पक्का पाक करून घ्यावा आणि तळण पात्र चुलीवर ठेऊन त्यांत तूप घालून खालीं मंद जाळ लावावा. तूप तापल्यावर भोंकाचें बेलें किंवा बोळकें घेऊन त्यांत तें फेंसून तयार केलेलें पीठ भरावें आणि भोंकावर बोट लावून तें तळण पात्रावर धरून बोट काढून

चपळतेनें तें बोळकें तुपावर तीन चार वेळा फिरवावें ( तीन चार वेढ्यांची जिलबी करावी ) नंतर त्यास एक बंध सांधा देऊन दुसरी जिलबी पाडावी. याप्रमाणें तळण पात्र भरेंपर्यंत जिलब्या पाडून लोटकें बाहेर काढावें आणि तळण पात्रांतील पाडलेल्या जिलब्या लाल होत तों तळून झाऱ्यानें काढून साखरेच्या पाकांत टाकाव्या. आणि कांहीं वेळानें काढून घ्याव्या.

बुंदीचे लाडू—एकशेर हरभऱ्यांचे डाळीचे पीठ घेऊन त्यास मोहन चोळून घिरड्याचे पिठाप्रमाणें पाण्यांत भिजवून पातळ करावें. नंतर चुलीवर कढई ठेऊन तींत दीडशेर तूप घालावें आणि चुलींत मंद जाळ ठेवावा. तूप तापल्यावर बुंदी पाडण्याचा झारा तुपावर ठेऊन तें पीठ वाटीनें अगर ओगराळ्यानें त्यावर ओतावें. नंतर झाऱ्याच्या दांड्यावर हाताच्या थापट्या मारून दाणेदार बुंदी कढईंत पाडाव्या. आणि दुसऱ्या झाऱ्यानें कढईंतील कळ्या दोन तीन वेळ उलथून तूप निथळून दुसऱ्या भांड्यांत ठेवाव्या. याप्रमाणें सर्व पिठाच्या कळ्या झाल्या ह्मणजे हाताला चिकटेसा साखरेचा पाक करून ठेवावा. आणि बुंदीच्या कळ्या एके कढईत घेऊन त्यांत ओगराळ्यानें पाक घालून त्यांचे लाडू बांधावे.




अभ्यंगस्नान:

दळाचे लाडू—एक शेर गव्हांचा रवा अर्धाशेर तुपांत थोडा थोडा भाजावा नंतर त्यांत एकशेर साखर, अर्धा-शेर तूप, सहा मासे लवंगाची पुड, एक तोळा वेलदोड्याची पूड, अर्धा पाव बदामाचे तुकडे आणि अर्धा पाव किसमिस इतके जिन्नस एकत्र कालवून रवा ऊन ऊन आहे तों साखा कालवून त्याचे लाडू बांधावे.

बेसनाचे लाडू—एक शेर हरवऱ्याची डाळ भाजून दळावी. नंतर त्यांत तूप, साखर व दळाचे लाडू प्रमाणें मसाला घालून लाडू बांधावे.

मुगदळाचे लाडू—मुगांची धुवाडाळ एक शेर तव्यावर भाजून दळावी. आणि त्यांत वर सांगितलेला मसाला घालून लाडू बांधावे.

गुळपापडी—शेरभर गव्हांस पाण्याचा हात लावून सडून त्यांत पाव शेर हरभऱ्याची डाळ घालून दळावें. नंतर त्या पिठास थोडें तूप चोळून गुळधवा भाजावें, (गुळधवा करपूं न देतां लाल होईतयैत भाजणें) आणि शेरभर गुळाचा पाक करून त्यांत घालावा. नंतर वेलदोड्याची पूड व पावशेर तूप त्यांत घालून पळीनें ढवळून ऊन आहे तोंच परातींत सारखें पसरावें आणि त्याच्या कापून वड्या पाडाव्या.

कानवले व मोदक शेरभर तांदुळ धुऊन वाळवावे आणि दळावे. नंतर सुमारें दोन शेर पाण्याचे आधण ठेवून त्यांत अर्धापाव लोणी अथवा पांच रुपये भार तूप टाकून पाण्यास चांगला कढ आला ह्मणजे तें पीठ त्यांत ओतून पळीनें ढवळीत असावें. पीठ शिजल्यावर पात्र चुलीवरून खालीं उतरावें व पीठ थोडें निवाल्यावर त्यास तुपाचा हात लाऊन मळून मऊ करून ठेवावें. नंतर दोन तीन नारळ फोडून त्यांचा कीस करावा आणि सव्वाशेर साखर किंवा गूळ, थोडीशी वेलदोड्याची पूड, अर्धापाव भाजलेली खसखस ह्या जिन्नसा एकत्र कराव्या. नंतर शिजलेल्या पिठांतील पोफळा येवढी गोळी घेऊन तुपाचा हात लावून पोळपाटावर पापडी लाटावी आणि तींत तें पुरण भरावें व करंजाप्रमाणें मुरड घालून सर्व कानवले तयार करून ठेवावे. नंतर मोदकपात्रांत पाणी घालून त्यास आधण आणावे. आणि त्या पात्रांतील चाळणीवर कानवले ठेवावे आणि झांकण लावावें. मोदकपात्र नसल्यास रुंद पातेल्यांत पाणी घालून त्याच्या तोंडाला दाद्रा बांधावा. आणि त्यावर कान्हवले पसरून ठेवून आधण आणावें. वाफ न जाई असें झांकण मात्र त्यावर ठेविले पाहिजे. कानवले शिजले ह्मणजे काढावेत. मोदकांत व ह्यांत अंतर

इतकेंच आहे कीं, मोदकाची पापडी कानवल्याप्रमाणें लांबट न करितां बताश्यासारखी गोल करावी आणि त्यांत हीं खालीलच पुरणभरून मोदक वळावेत आणि कानवल्या प्रमाणेंच उकडावेत; ह्मणजे मोदक तयार होतात.

श्रीखंड—पांच शेर दूध रात्रीस चांगलें तापवून तें थोडें उष्ण आहे तोंच त्यास विरजण लावावें. सूर्योदय झाल्यावर एके स्वच्छ रुमालांत तें दही बांधून टांगून ठेवावें. किंवा जलदी असेल तर भुईवर शेणाची राख पसरून तीवर स्वच्छ रुमाल पसरावा आणि त्यावर दहीं ओतावें. राख दह्यांतील पाणी फार लौकर शोषून घेते. नंतर घट्ट झालेलें दहीं एका भाड्यांत भरून ठेवावें. नंतर सव्वाशेर स्वच्छ साखर घेऊन एकेरातेल्यास दादरा बांधून घट्ट केलेलें दहीं व साखर थोडथोडी गाळावी नंतर खललेलें केशर सहामासे, वेलदोड्याची पूड सहामासे, किसलेले जायफळ, एक लवंगाची पूड तीन मासे आणि कस्तुरी एक गुंज. इतकें पदार्थ त्यांत मिळवावे ह्मणजे श्रीखंड तयार होतें.

बासुंदी—चुलीवर दूध ठेवून खिरी सारखें होई पर्यंत खूप आटवावें नंतर शेरास पावशेर या मानानें चांगली साखर, वेलदोड्याची पूड, बदामाचे तुकडे, बेदाणा, इत्यादि

टाकून सर्वांचा एक जीव होईपर्यंत दूध टवळावें, ह्मणजे बासुंदी तयार होते.

करंजा—रवा व पिठी समभाग घेऊन त्यांत थोडें मिठाचें पाणी टाकून व त्यास तुपाचें मोहन चोळून त्यावर पावशेर निरसें दूध शिपून पाण्यांत घट्ट तिंबून वर ओलें चिरगूट घालून झांकून ठेवावें हें पीठ एकशेर असल्यास पाउणशेर रवा तुपांत भाजून त्यांत तितकीच कोथळी साखर, सहा मासे वेलदोड्याची पूड, पावशेर भाजलेली खसखस, हे सर्व पदार्थ एके पात्रांत कालऊन ठेवावें. नंतर तें पीठ पुन्हः खूप मळून मऊ करावें आणि त्याच्या फोफळा एवढ्या गोळ्या करून त्याच्या मोठ्याश्या बताशा एवढाल्या पुऱ्या लाटाव्या आणि त्यांत बेताचें पुरण भरून आंगठ्यानें कांठ दडपून मुरड घालावी अथवा फिर्कीनें कापून तयार कराव्या अशा सर्व करंजा तयार झाल्यावर डाग न पडतां तुपांत तळाव्या. करंजांत कोठें कोठें खोबऱ्याचें ही पुरण घालतात त्यास मसाला, रव्याशिवाय सर्व वर सांगितल्या प्रमाणें रव्याबद्दल सुखलेल्या खोबऱ्याचा कीस घ्यावा.

अनरसे—एक शेर तांदूळ तीन दिवस भिजत वाघालून (त्यांतील पाणी रोजचे रोज बदलावें) शेवटल्या दिवशीं दुरडींत वालून त्यांतील पाणी निथळावें. तांदूळ

वाळले ह्मणजे उखळांत कांडून त्याचे पीठ करावें नंतर त्या पिठास थोडे मोहन घोळून त्यांत सव्वाशेर गुळ घालून त्यास पुनः उखळांत वरचेवर दूध शिंपून कांडावें. यावेळेस दोन पिकलेलीं केळीं त्या पिठांत कुस्करून टाकावीं- पिठाचा व गुळाचा एक जीव होऊन चांगला गोळा झाला, ह्मणजे तो केळीचे पानांत गुंडाळून ठेवावा. नंतर ऐके वाटींत खसखस घेऊन सदरील गोळयांतील मोठ्या सुपारी एवढी गोळी करून घेऊन ती गोळी केळीचे पानावर दाबून वर्तुळाकार थोडी रुंद करावी. यावेळेस एके बाजूनें गोळीस खसखस लावावी. असे सर्व अनरसे तयार झाल्यावर चुलीवर तळणी ठेऊन तूप घालावें आणि साधारण जाळ लावून तूप तापल्यावर खसखशीच्या बाजूनें त्या तळणींत सोडून तळून काढावें. तळतानां अनरसा न फुटण्या विषयीं व डाग पडण्याविषयीं सावधगिरी ठेवावी, व अनरसे बुडतील, इतकें तूप तळणपात्रांत असावें.

कोणी कोणी तांदूळ सावलींत वाळवून दळतात, आणि त्या पिठांत गुळ मिसळून ते १०।१५ दिवस ठेवतात. अनरसे करतेवेळेस पहिल्यानें एक दोन तळून पहावे. जर फुटले तर तो गोळा कुटून घ्यावा. ह्मणजे फुटणार नाहींत.

कडबोळीं—एक तोळा मिरच्या, ६ मासे लसूण, १ तोळा धने, ३ मासे जिरें, १ मासा हिंग, ६ मासे आलें, आणि १॥ तोळा मीठ, हे सर्व पदार्थ एकत्र वाटून उडदांचें पीठ सवा अथवा दीडपाव घेऊन पाण्यांत घट्ट कालवून मऊ करावें आणि त्यांत तो मसाला मिसळावा. नंतर त्यांतून लिंबा एवढी गोळी घेऊन तिची लड्डवात करावी, व गुंडाळावी. ह्मणजे कडबोळें झालें. हीं उकडून किंवा तेलांत तळून काढतात.

कोणी कोणी अनेक धान्यें एकत्र करून त्यांत उडदांचा भाग अधिक ठेवितात. आणि त्यांचें पीठ करून वरील मसाल्यासह वर सांगितल्याप्रमाणें कडबोळीं करतात.

## प्रकरण ४ थें समाप्त.

# दीपवाळी रंजन.

## प्रकरण ५ वें.

### अग्निक्रीडा

म्हणजे

### चमत्कारिक दारूकाम करण्याची माहिती.

दिपवाळीच्या महोत्सवप्रसंगीं अनेक प्रकारचें रंगीबेरंगी दारूकाम लाऊन मनरंजन करण्याचा प्रघात आहे, ह्मणून ह्या कामाविषयीं आमच्या लोकांस माहिती असल्यानें सर्वांस गोडीवार पडेल असें जाणून त्या पुस्तकांत त्याविषयीं थोडक्यांत माहिती लिहितों.

दारूकामाचे नळे ( आनार ), चंद्रज्योती ( हवई ) फुलबाजी, बाण, चिचुंद्री इत्यादि अनेक प्रकार आहेत. ते तयार करण्यास लागणाऱ्या पदार्थांत सोरा ( सूर्याखार ) गंधक, कोळसा, हीं मुख्य द्रव्यें ( पदार्थ ) असून बीड, हरताळ, मनशीळ, सुरमा ( आन्टीमनी ) गुळी, कापूर, चुनकळीचें पीठ याचाही उपयोग पडतो. याकरितां हे पदार्थ शुद्ध व स्वच्छ असले तरच दारूचे अंगीं तजेला येतो याकरितां हे पदार्थ शुद्ध कसे करावे याचें थोडक्यांतच दिग्दर्शन करितों.

### सोरा शुद्ध करण्याची कृती

बाजारांत बंगाली सोरा विकत मिळतो, त्याच्या पारदर्शक कांड्या असतात, तो आणून एका रुंद तोंडाचे पात्रांत घालावा.

आणि त्यांत त्याच्या निम्मे पाणी घालून तें भांडें विस्तवावर चढवून त्यांतील पाणी व सोरा चांगल्या रितीनें उकळूं द्यावा. व त्याची सारेप्रमाणें मळी काढीत जावी. मळी निघण्याकरितां ९ शेर सोन्यास एक आंडें किंवा सोन्याच्या शतांश तुरटीची पूड टाकावी.

नंतर सर्व पाणी आटण्याच्या बेतांत आलें ह्मणजे खदखदूं लागतें. त्यावेळीं पळीनें एकसारखें ढवळीत असावें. कारण, खार तळीं लागला तर जळून निकस होतो. नंतर अग्नी थोडा कमी करून सोरा कोरडा होत आला ह्मणजे परातींत किंवा एखाद्या रुंद पात्रांत पसरून कडक उन्हांत ठेवावा. आणि तो चांगल्या रितीनें सुकला ह्मणजे बाटलींत भरून ठेवावा. ह्मणजे दारूकामास योग्य होतो.

## गंधक तयार करण्याची क्रती.

गंधकाच्या कांड्या किंवा खडे बाजारांत विकत मिळतात. तो गंधक आणून वांटून किंवा दळून काजळाप्रमाणें बारीक करावा. कणी अगदीं राहूं देऊं नये. कारण किंचितही कणी राहिल्यास तो भाग दारूच्या मिश्रणांत न मिळतां निरुपयोगी होऊन वजनांत फरक पडतो.

---

१ प्रथम पाण्यांत सोरा घालून उकळी आल्यावर दोन तीन वेळ मळी काढून नंतर आंडें कवचीसुद्धां चुरडून टाकावें आणि ढवळून ढवळून मळी काढावी.

२ कोणी कोणी मळी काढण्याकरितां सोन्यांत दूध किंवा ताक घालतात. परंतु त्या पेक्षां आंडें किंवा तुरटी टाकल्यास सोरा चांगला शुद्ध होतो,

## कोळसा तयार करण्याची कृती.

दारूकामांत बहुतकरून शेर निवडुंग, तुर, राई, देवदार, आघाडा याचे लांकड चा कोळसा घेतात. ह्या कामांत जितका हलका कोळसा असेल तितका चांगला. कारण, कोळसा जड असला तर दारू लवकर पेट घेत नाहीं. दारूकामांत शेराचा कोळसा असला तर दारूकाम चांगलें उतरतें. याकरितां शेराचा कोळसा घ्यावा.

वरील तीन प्रकार एकाच जात्यांत दळणें असेल तर प्रथम सोरा नंतर गंधक आणि त्यानंतर कोळसा ह्याप्रमाणें दळावें. परंतु प्रत्येक वेळीं जातें स्वच्छ पुसावें किंवा धुवून सुकल्यावर दुसरा पदार्थ दळावा.

## *बीड कुटून तयार करण्याची कृती.

गांवठी बिडाचे तुकडे (हें बीड बहुतकरून पुण्यास मिळतें) लोखंडाच्या घणानें लोखंडाच्या ऐरणीवर बारीक करावें. आणि त्याचे बाजरी इतकें जाड, त्यापेक्षां किंचित बारीक खसखसी एवढें ह्याप्रमाणें तीन चार प्रती करून हवा न लागे अशा निरनिराळ्या बाटलींत भरून ठेवाव्या.

## मोतिया नळ्याकरितां बीड तयार करण्याची कृती.

लोखंडी लहान लहान पड्यांचा ( ज्यास टीनचे पत्रे ह्मणतात ) थरावर थर देऊन त्यांस चांगला ताव द्यावा ह्मणजे त्याचा एक

---

*बिडांत तीन जाती आहेत. १ पक्कें, २ कच्चें, ३ मोतीबीड फूल अनारांत पक्कें बीड, फुलबाजींत कच्चें बीड, आणि मोतिया अनारांत मोतीबीड असावें. तसेंच चमेली आणि चेटकी (तबकी) अनारांत पक्कें कच्चें बिडाची चवथी प्रत ( माती ) असावी.

जीव होतो. आणि तो गरम असतांच पाण्यांत विझवावा. नंतर वर सांगितलेल्या बीड तयार करण्याच्या कृतीप्रमाणें कुटून त्याच्या निरनिराळ्या प्रती करून ठेवाव्या. हें बीड मोतिया नळ्याच्या दारूंत घालण्यास उपयोगीं पडतें.

## अन्टिमनी ( सुरमा ) तयार करण्याची कृती.

ह्या धातूचे चकचकीत काळ्या रंगाचे खडे बाजारांत विकत मिळतात. ते आणून लोखंडाच्या खलांत कुटून व चांगल्या रीतीनें घोटून काजळाप्रमाणें बारीक पूड करून बाटलींत भरून ठेवावी. हिलाच सुरमा असें ह्मणतात.

या शिवाय हरताळ, मनशीळ, गुळी, कापूर, यांचाही दारू-कामांत उपयोग पडतो. याकरितां हे पदार्थ दगडी किंवा गारेचे खलांत कुटून घोटून काजळाप्रमाणें बारीक झाल्यावर बाटलींत भरून ठेवावे.

## फुलबाजी.

फुलबाजी हा अग्निक्रीडेंतील विशेष मौजेचा प्रकार आहे. फुलबाजी लाविली असतां तिचे तोंडीं चंद्र प्रकाशाप्रमाणें लहानशी ज्वाला दिसून तें तेथपासून खालपर्यंत जणूं काय अग्निपुष्पांची माळच लागली आहे असें दिसतें.

सर्वोत्कृष्ट घोंसदार फुलांची फुलबाजी करणें असल्यास शुद्ध केलेला चांगला सोरा, चांगला गंधक, शेराचा कोळसा आणि नवें कच्चें बीड असे पदार्थ असावे.

## सर्वोत्कृष्ट फुलबाजीचीं वजनें.

| पदार्थ | १ लें | २ रें | ३ रें | ४ थें |
|---|---|---|---|---|
| सोरा | १३ | २२ | २८ | ३॥ |
| गंधक | १ | २ | २॥ | -।- |
| कोळसा | १ | २ | २। | ।- |
| बीड कच्चें | ३॥ | ६ | ७॥ | -॥- |

हीं चार वजनें उत्तम प्रकारचीं आहेत.

फुलबाजीची दारू तयार करते वेळेस बीड खेरीज करून तीन द्रव्यें ( सोरा गंधक, कोळसा ) तांब्याचे परातांत किंवा लांकडाचे पाळयांत, किंवा जाड कार्ट्रिज पेपरावर वजनवार टाकून चोळून चोळून एक जीव केल्यावर त्यांत वजन केलेलें बीड टाकावें आणि पुन्हां कांहीं वेळ चोळून चांगल्या रीतीनें मिश्र करावें. नंतर फुलबाजीच्या कागदी पोलांत तयार केलेली दारु थोडी भरून बारीक सळईनें हलक्या हातानें दाबून भरावी फुलबाजी भरते वेळीं पोकळी किंवा पोलास चुणी पडल्यास तें पोल फोडून दुसऱ्या पोलांत भरावी. कारण पोंचटपणा किंवा चुणी पडलेली फुलबाजी एकसारखी धोंसदार न पडतां तुटत तुटत पडते. आणि पोंचट जागीं भरकन पेटून हात पोळण्याचा प्रसंग येतो याकरितां फुलबाजी भरण्यांत कुशळता व सावधगिरी ठेविली पाहिजे.

फुलबाजी तयार केल्यापासून आठ दिवसपर्यंत चांगली टिकते. पुढें बिडावर जंग चढून फुलें तांबूस रंगाचीं पडून तींत पूर्वीप्रमाणें तजेला रहात नाहीं.

## फुलबाजीच्या आकारमानानें बीड व कागद घेण्याचा प्रकार.

जाडी किती असावी.

| | |
|---|---|
| -। इंच पासून | -॥ इंच पर्यंत. |
| -॥ इंच पासून | १ इंच पर्यंत. |
| १। इंच पासून | २ इंच पर्यंत. |

बीड कसें घेणें.

खसखसी प्रमाणें.

बाजरी एवढें-जाड.

बाजरीपेक्षां-जाड.

कागद कसा करावा.

पातळ फ्रेंच किंवा फुलस्केप.

जाड फुलस्केप किंवा जाड अमदाबादी.

## अनार.

फुलबाजीपेक्षां अनाराची शोभा फारच मनोरम दिसते. हा लाविला असतां त्यांतून पुष्पवृष्टी होत आहे असें दिसतें. नळा लाविला असतां एकदम वर जाऊन विझावा हें बरोबर नाहीं. प्रथम थोडा थोडा उंच होत जाऊन पुन्हा थोडा थोडा कमी होत गेला पाहिजे. तसेंच फुलांचा वर्षाव होणें तोही भरगच्च असावा. कोठें-कमी कोठें अधिक असूं नये. अनारांत शेंवती, चमेली, सरू, मोतिया आणि तबकी (बैठकी) ह्या मुख्य जाती आहेत. परंतु फुलांच्या आकारमानानें आणखी पोट भेद मानतात. परंतु त्यांत अर्थ नाहीं.

## उत्तम शेंवती फुल अनाराचीं वजनें.

| द्रव्यें | १ लें | २ रें | ३ रें | ४ थें |
|---|---|---|---|---|
| सोरा | २८ | २४ | ३० | ७ |
| गंधक | ७ | ३॥ | ४॥ | २। |
| कोळसा | ३ | ३ | ४ | १ |
| *बीड पक्कें | १३ | १६ | २० | २॥ |

प्रथम बीड खेरीज करून इतर पदार्थ फुलबाजीचे कृतींत सांगि- तल्याप्रमाणें एक जीव करून नंतर तें बीड मिश्र करावें. ह्मणजे दारु तयार झाली.

नंतर अनाराकरितां तयार केलेलीं मध्यम मोकांचीं पोळें घेऊन त्यांत तयार केलेली दारू भरावी. आणि तिच्या बुडाशीं प्रथम थोडी सुखी राख व नंतर माति व चिखल लावून बंद करावी. आणि अनाराच्या मोंकावर वरच्या बाजूनें कागदाचा तुकडा डक- वावा. नळ्याकरितां दारु तयार करणें ती लावतेवेळीं ताजी के- ल्यास अनारास विशेष शोभा येते.

## उत्तम मोतिया अनाराचीं वजनें.

| द्रव्यें | १ ले | २ रें | ३ रें | ४ थें |
|---|---|---|---|---|
| सोरा | २८ | २८ | २४ | १२ |

---

*अनारांत बीड घालणें तें बारीक, मध्यम, जाड, माती याप्रमाणें घालावें. त्याचा प्रकार पावशेरपासून अर्धा शेरपर्यंत दारु ह्याच्या अनारांत बारीक पाऊण शेरपासून दोन शेरी अनारांत मध्यम आणि तीन शेरी अनारांपासून पांच शेरी अनारांत बाजरीएवढें जाड घालावें.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गंधक | ७ | ४ | ४॥ | १॥ |
| कोळसा | ३॥ | ४ | ४। | १॥ |
| माती बीड | १३ | १६ | १६ | ६ |

ही दारू मिश्र करण्याची कृती वरील प्रकाराप्रमाणें.

## तवकी ( बैठा ) नळ्याचीं उत्तम वजने.

| द्रव्यें | १ लें | २ रें | ३ रें | ४ थें |
|---|---|---|---|---|
| सोरा | २४ | १६ | १० | १६ |
| गंधक | ६ | ४ | १॥ | ७ |
| कोळसा | १४ | १२ | ५ | १९ |
| मोतियाची माती | २४ | १४ | ८ | १६ |

मागें सांगितल्याप्रमाणें मिश्र करून ती दारू हलक्या हातानें नळ्यांत भरावी.

## उत्तम मुद्धचा अनार.

| द्रव्यें | १ लें | २ रें | ३ रें | ४ थें |
|---|---|---|---|---|
| सोरा | ३० | १५ | २४ | १२ |
| गंधक | ५। | ३ | ६ | १॥ |
| कोळसा | ३॥। | ४॥ | ४ | १॥ |
| बीड रवेदार | २१ | ६ | २४ | ५ |

येणेंप्रमाणें मिश्रण तयार करून अनार भरावे.

## चंद्रज्योत.

ही लाविली असतां तिचा चंद्रप्रकाशाप्रमाणें उजेड पडतो. ह्मणून हिला ' चंद्रज्योत ' असें ह्मणतात. हिला महिताप, हवई असेंही ह्मणतात.

## उत्तम सफेत चंद्रज्योतीचें वजन

शुद्ध केलेला सोरा ४ भाग, गंधक १ भाग, सुरमा ·॥· भाग हरताळ ·।· भाग येणेंप्रमाणें पदार्थ अगदीं काजळाप्रमाणें बारीक केलेले घेऊन ते चांगल्या रीतीनें एकत्र करून त्यापैकीं पावशेर दारू ( पाहिजे तर जास्त भरावी. ) पण तींत मातीचें पोल भरून वर गोंदानें किंवा खळीनें कागद चिकटवावा.

## उत्तम सफेत चंद्रज्योतीचें दुसरें वजन.

सोरा १६ भाग, गंधक ४ हरताळ ·॥· कापूर ·।· गुळी ·॥· या भागाप्रमाणें बारीक वस्त्रगाळ पदार्थ घेऊन हवई ( चंद्रज्योत ) तयार करावी.

## विलायती चंद्रज्योत.

शुद्ध सोरा ७ भाग, गंधक १॥ भाग, आणि सुरमा ·।॥· भाग ह्या वजनानें तयार केलेल्या चंद्रज्योतीची प्रभा उत्तम पडते.

## तांबड्या चंद्रज्योतिचीं वजनें.

### प्रकार १ ला

| | |
|---|---|
| नाइट्रेट ऑफ स्ट्रान्सिया | ४० भाग |
| शुद्ध केलेला गंधक | १४ भाग |
| अन्टिमनी | १॥ भाग |
| काजळ | २ भाग |
| क्लोरेट ऑफ् पोट्याश | ४॥ भाग |

हे सर्व पदार्थ अगदीं बारीक वस्त्रगाळ असावे प्रथम क्लोरेट ऑफ् पोट्याश शिवाय बाकीचे सर्व पदार्थ वजनदार घेऊन ते चां-

गल्या रीतीनें एक जीव करून नंतर त्यांत क्लोरेट ऑफ् पोट्याश मिश्र करावा. ह्मणजे ही तांबड्या हवईची दारु तयार झाली. ह्या दारुस किंचित्ही घर्षण झालें तर मोठा आवाज होतो. याकरितां ही तयार करतेवेळीं फारच सावधगिरी ठेविली पाहिजे.

### प्रकार दुसरा.

| | |
|---|---|
| नाइट्रेट ऑफ् स्टान्सिया | ३३ |
| गंधक | ९ |
| क्लोरेट ऑफ् पोट्याश | ८॥ |
| काजळ | २ |

ही दारु वर सांगितल्याप्रमाणें तयार करावी.

## हिरवी चंद्रज्योत.

### प्रकार १ ला.

| | |
|---|---|
| नाइट्रेट ऑफ् बरायटा | १० भाग |
| चांगला गंधक | ३॥ भाग |
| क्लोरेट ऑफ् पोट्याश | १ भाग |
| सुरमा ( अन्टिमनी पोठ ) | -॥- भाग |

ही दारु वरील प्रकारांत सांगितल्याप्रमाणें तयार करावी. हिरव्या रंगाची हवई करण्यांत 'बरायटा' हें मुख्य द्रव्य आहे. त्याचे 'नाइट्रेट ऑफ् बरायटा' आणि 'क्लोराईट ऑफ् बरायटा' असे दोन भेद आहेत पैकीं क्लोराइट ऑफ बराइटा घेतल्यास फारच उत्कृष्ट हिरवा रंग होतो. परंतु तो फारच महाग असल्यामुळें 'नाइट्रेट ऑफ् बरायटा' घेत असतात.

### प्रकार दुसरा

| | |
|---|---|
| क्लोराईड ऑफ् बरायटा | ६ भाग |
| गंधक | ४ भाग |
| क्लोरेट ऑफ् पोट्याश | १५ भाग |

ही वरील कृतीप्रमाणें तयार करावी. हिची प्रभा गहिऱ्या हिरव्या रंगाची पडते.

## चिंचुंद्र्या तयार करण्याची कृती.

सोरा ५ भाग किंवा ४॥ भाग, गंधक १ भाग. आणि कोळसा १ भाग, ह्या प्रमाणें पदार्थ घेऊन कातड्यावरच किंचित् पाणी लावून चांगल्या रीतीनें एक जीव करावे. नंतर फुलबाजीच्या पोलाप्रमाणे कागदी पोल पाव इंच जाडीचे व चार बोटें लांबीचें असे तयार करून त्यांत तयार केलेली दारु ठांसून भरावी म्हणजे चिचुंद्री तयार झाली.

चिचुंद्री जाड सुतळीस बांधून ती सुतळी एका दगडास बांधून लावावीं. किंवा बांबूच्या लवचीक काडीचें एकवीत व्यासाचें चक्र तयार करून त्यास सदरील चिचुंद्री बांधून लावावी. ह्मणजे ती चक्राकार फिरत जळते. चिचुंद्री लावणें ती नेहमीं रस्त्यावर मध्यभागीं लावावी.

## सुरसुऱ्या.

सुरसुऱ्या करणें असतील तर वर सांगितल्याप्रमाणें दारू तयार करून ती कागदी पोलांत भरून त्या पोलास हातभर लांबीची काडी सुतानें बांधावी. ह्मणजे लाहन मुलास हातांत धरून लावण्याकरितां सुरसुऱ्या होतात.

## बंदुकीप्रमाणें आवाज होणारी दारू तयार करण्याची कृती.

क्लोरेट ऑफ् पोट्याश १ भाग, आवळसारी गंधक २ भाग, हे पदार्थ प्रथम निरनिराळें बारीक वस्त्रगाळ करून नंतर एकत्र करावे. ह्या मिश्रणांतील चिमुटभर पूड सपाट दगडावर ठेवून तिच्यावर खलबत्त्याचा दांडा किंवा हातोडा मारावा म्हणजे बंदुकीप्रमाणें मोठा आवाज होतो. किंवा कागदांत गुंडाळून वर हातोडा मारावा.

## बत्त्या तयार करण्याची कृती.

बत्ती दोन प्रकारची, एक सुताची व दुसरी कागदाची. कच्चें सूत सामान्य पीठ घातलेले पाण्यानें भिजवून चुबकून चुबकून अगदीं मऊ होई असें करावें व एकदां पिळून पाणी काढून टाकावें. पुन्हां पाण्यांत घालून सर्व सूत नीट भिजवावें. अथवा सूत कांहीं वेळ पाण्यांत भिजत घालावें. नंतर चुबकून तें पिळून टाकावें.

नंतर एका लोखंडी घमेल्यांत जलद पेटणारी कमावलेली दारू ( बाणाची अगर बाराची ) घालून त्यांत पाणी घालावें आणि बिराणें किंवा भुकणी असेल ती सर्व त्या पाण्यांत मिश्रण करून सरबरीत दाट खिरीसारखा चिखल, शाईप्रमाणें पण कांहीं घट्ट असा करावा. बाणाची किंवा बाराची दारू तयार नसेल तर ४॥ भार सोरा, १ किंवा १। भार गंधक, आणि १ भार कोळसा, यांस पाणी लावून खुब मळून कुटावी. पारवे रंगावर आल्यावर त्याचे शाईप्रमाणें सरबरीत पाणी करावें. नंतर त्यांत

( पूर्वीं तयार केलेलें ) सूत ८ कलाक भिजत घालून नंतर तें सूत खुब मळून टाकावें. सूत कोरडें पडल्यास किंचित पाण्याचा हाः बका द्यावा. नंतर त्यांस पीळ घालून दोरीप्रमाणें वळावें, नंतर सुकवावें. वाळतेवेळीं माती लागूं देऊं नये. तयार केलेली दारू हातानें कागदास लावावी व ते कागद सुकवावे म्हणजे कागदाची बत्ती होईल. ह्या बाण, चिचुंद्र्या ह्यांस उपयोगीं पडतील.

## आकाशांत उडून जाणारे बाण.

बाण आकाशांत वरती उडून जातांना सर्पासारखा दिसतो व एखादे समयीं तो डुलत जातो, तेव्हां त्याची फारच विलक्षण शोभा दिसते. बाणाचे तोंडाशीं ज्वालेची सफेत प्रभा दिसून मागें ठिण ग्यांचा पिसरा दिसतो, आणि त्याचे आंतील दारूचे समाप्तिसमयीं उंचावर आकाशांत तारे प्रफुल्लीत होऊन जशा कांहीं चांदण्या पडत आहेत अशी शोभा दिसते.

बाण लोखंडाचे, शिंगटाचे, कळकाचे आणि कागदाचे असे ४ प्रकारचे करितात.

बाणाचीं पोलें चांगल्या कागदाचीं करावीं. चवली, पावली, अधेली आणि रुपया एवढया गर्भाचीं करावी.

बाणाचे दारूस जोरदार सोरा घालावा. या दारूस कमजोर सोरा कधीं घालूं नये.

| वजनें प्रत. | सोरा. | गंधक. | कोळसा. |
|---|---|---|---|
| १ | ४ | -\|\|\|- | ॥\|- |
| २ | ४ | १ | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | ४॥ | १ | १ |
| ४ | ५ | १ | १ |

हीं वजनें लहान पोलास घालावीं.

## उत्तम वजनें.

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | १० | १॥ | ४ |
| ६ | १० | २ | ४ |

आह्मीं नवीन शोधून काढलेलीं सर्वांत उत्तम वजनें, हीं सर्व प्रकारचे कागदी बाणाचे पोलास चालतात. अति मोठ्यास सरासरी चालतात.

५ वें बाणाचें वजन कळकी बाणास व मोठे पोलास चालत नाहीं. याची दारु पारवे रंगावर येईपर्यंत कुटली पाहिजे. ही दारू चांगली न कुटली तर बाण चांगला होणार नाहीं.

६ बाणाची दारू वर प्रमाणेंच कुटली पाहिजे यांत ५।६ पर्यंत तारे चालतात बाण वर जातांना मोठा सरसराट होऊन फार उंच जातो.

## सर्व रंगाचे तारे कसे करावे याविषयीं.

बारीक चांदण्याप्रमाणें ज्यांचें तेज चमकत असतें व तारे तुटतात, त्याप्रमाणें ज्याची शोभा दिसते त्यांस तारे ह्मणतात.

## शुभ्र किंवा सफेत तारे.

सोरा ८, गंधक २, अन्टिमनी २ किंवा कोणी १॥ भारही घालतात. अन्टिमनीचे मिश्रणाचा तारा उत्तम होतो. अन्टिमनी न मिळेल तर हरताळ किंवा मनशीळ हे एक एकटेच दोन दोन भार

घालावे, आणि दोन्ही घालणें असतील तर एकेक जिन्नस एक एक भार घालावा ह्मणजे ही दारू उत्तम होते.

## तांबडे लाल तारे.

स्ट्रान्सिया ४०, गंधक १६, क्लोरेट ऑफ पोट्याश १२॥ यांतही एक किंवा अर्धा भार अन्टिमनी घातली तर रंगखुला तांबडा होऊन तारा जलद होतो. आणि अन्टिमनी न घातली तर गर्द तांबडा रंग होऊन तारा जलद होतो, तथापि अन्टिमनीचें मिश्रणा इतका जलद नसतो. कारण अन्टिमनींत गंधकाचा अंश असतो ह्मणून त्या योगानें जलदी होतो.

## दारूकाम करणारांस उपयुक्त सूचना.

ह्या पुस्तकांत दारूकामाचीं जीं वजनें दिलीं आहेत तीं फार चांगलीं आहेत. दारू करतेवेळीं जर ह्या वजनापासून मनायोग्य काम झालें नाहीं तर निराश न होतां किंचित फेरफार करावा ह्मणजे बरोबर उतरेल.

प्रथम नमुन्याकारितां थोडें वजन टाकून दारू तयार करून ती लावून पहावी. त्यांत फुलबाजी व अनार हीं फुलें बरोबर धरत नसलीं तर कोळसा किंचित अधिक करावा. आणि जोर धरत नसल्यास गंधक किंचित अधिक घालावा. रंगीत दारू बरोबर पेटत नसली तर 'क्लोरेट ऑफ पोट्याश' किंचित अधिक घालावा ह्मणजे काम मनाप्रमाणें उतरेल.

दारूकामांत बीड खेरीजकरून इतर सर्व पदार्थ शुद्ध असून काजळाप्रमाणें अगदीं बारीक असावे, दुसरे सर्व पदार्थ उन्हांत चांग-

त्या रितीनें वाळवून ठेवावेत. दमदार असूं नयेत. तसेंच दारूचें मिश्रण करणें तें एकदम पुष्कळ करून पुष्कळ दिवस ठेवूं नये. जसें लागेल त्या मानानें वेळच्यावेळीं नवीन तयार करीत जावें. ह्मणजे दारूकाम विशेष मौजेचें दिसेल. मिश्रण करणें तें सर्व पदार्थ वजनवार घेऊन बराच वेळपर्यंत चोळून चोळून चांगल्या रितीनें एकजीव करावे.

## अग्नीक्रिडा समाप्त.

# दिपवाळी रंजन.

## प्रकरण ६ वें.

## रंगवल्लीक्रिया.

दिवाळीचे दिवस आले, ह्मणजे आपापलीं आंगणीं नीट करून स्वच्छ सारवून नाना प्रकारच्या रंगांनीं चित्रविचित्र आणि मनोरम रांगोळ्या काढून घराच्या पुढील प्रदेश सुशोभित करण्याची चाल आहे. हें काम घरांतील लहान लहान मुली व तरुण स्त्रिया यांनीं करायाचें अशी पूर्वापार चाल आहे. त्याच चालीला अनुसरून या मुंबई शहरांत शेणवी, परभू, सोनार, खत्री इत्यादि लोकांच्या मुली दसऱ्यापासूनच आपापल्या अंगणांत रांगोळ्या घालतांना दृष्टीस पडतात. यास्तव ही पुरातन रीति या सणाच्या संबंधाचीच आहे, असें मानून आह्मीं त्याविषयीं थोडकीशी उपयुक्त माहिती देत आहों.

आपल्या लोकांत नित्य प्रातःकाळीं घरोघर सडासंमार्जन ( झाडणें व सारविणें ) करून त्याच वेळेस रंगवल्लीनीं भूमि सुशोभित करण्याची चाल सर्वत्र आहे. नित्यशः जी रांगोळी घालणें, ती अनेक नित्य कृत्यांच्या पाईपुढें

वेळ मोडून नीटनेटकी व सुबक करण्यास कोणी झटत नाहींत, पण सणाचा प्रकार रोजच्याहून निराळाच असतो. त्या दिवशीं लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांस उत्सुकता असल्याकारणानें सर्वच कामें सुशोभित करावीं अशी कल्पना उत्पन्न होणें साहजिक आहे. आणि त्याच कल्पनेवरून दिवाळींत सुरेख रांगोळ्या काढण्याची चाल पडली आहे. तर पहिल्यानें रंगवल्ली काढणें त्या कोणकोणत्या रंगांनीं काढाव्या ? असा प्रश्न उत्पन्न होतो त्याचें उत्तरः—

ज्या वेळेस आपल्या देशाची, धर्माची आणि लोकांची ऊर्जित दशा होती, व जेव्हां हिंदुप्रजा धनकनक संपन्न होती. तेव्हांचे इतिहास पाहिले तर अशा आनंदोत्सवप्रसंगीं लोक आपापल्या दारांसमोर केशर, कस्तुरीं मिश्रित उदकाचे सडे घालून मौक्तिकचूर्ण, हरिद्रा, कुंकुम इत्यादि श्रेष्ठ पदार्थांनीं रंगवल्ली काढून आपापलीं घरेंदारें शोभवित असत. परंतु जसजशी निकृष्ठावस्था येत चालली, तसतसें सर्वच मान उतरत चाललें आणि आतां तर जेवढा कमी खर्च होईल तेवढा पाहण्याकडे सर्वांचें लक्ष्य ओढलें गेलें आहे. तर अशा स्थितींत केशर, कस्तुरी व मौक्तिकचूर्ण, हीं नांवें मात्र उपलब्ध आहेत. खरें पाहिलें तर कोणीही यांचा उपयोग करण्यास शक्तिमान होत नाहीं. तरी

पूर्वीच्या रीति अजीबात नाहींशा होऊं नयेत असें मनांत धरून सुजाण लोकांनीं निराळ्या रंगांनीं रांगोळ्या शोभविण्याची चाल पाडली आहे. ते रंग.–

देशावर शिरगोळा या नांवाचा एक जातीचा दगड आहे. तो कुटून पांढरी स्वच्छ रांगोळी तयार करितात व कोंकणांत भाताचा ( साळीचा ) कोंडा युक्तीनें जाळून त्याची स्वच्छ राख रांगोळीच्या कामास घेतात. नित्यशः घर किंवा आंगणें सारविल्यावर जे कणे ( रंगवल्ली ) काढणें, ते या रांगोळीचे काढितात. ह्याच रंगवल्ली सणांत सुशोभित करण्यासाठीं नानाप्रकारच्या बाजारांत मिळणाऱ्या आयत्या रंगाचा उपयोग करितात. ते रंग मुख्यत्वेंकरून लाल कुंकू, पिवळा ( हळदीं, ) हिरवा, शेंदरी, असमानी ( आकाशरंग ) पोपटी, नारंगी, गुलाबी आणि पांढऱ्या ऐवजी मागें सांगितलेली रांगोळी असे नऊ प्रकारचे आहेत. त्यांतही लालरंगाबद्दल कुंकू घेण्याऐवजीं कोणी गुलालाचा उपयोग करितात. आणि कित्येक पिवळ्या हळदी ऐवजीं बाजारांतून पिवडी ( पिवळारंग ) आणून उपयोग करितात. कित्येक चतुर मुली रंगारंगाच्या मिश्रणानें अनेक रंग तयार करून ते रंगवल्लींच्या उपयोगास आणितात. पण तो प्रकार विस्तार भयास्तव देतां येत नाहीं.

रंगवल्ली काढणाऱ्या बहिणीस उपयुक्त सूचना--ज्या जमिनीवर रंगवल्ली काढणें असेल, ती जमीन उंच, नीच किंवा खळगे पडलेली नसावी, व ती सारवून स्वच्छ केलेली असावी. ज्या भागांत कणा पाडणें असेल, त्याचा मध्य साधण्यासाठीं चांगले लक्ष्य दिलें पाहिजे.

रंगवल्ली काढण्याचे आधीं जो आकार काढणें असेल तशा आकाराचे बिंदु सारख्या अंतरानें पाडावे म्हणजे रेघा काढण्यास कठीण पडणार नाहीं. रांगोळीच्या रेघा सारख्या येण्याचें मुख्य बीज सारख्या अंतरानें पाडलेले बिंदु हेंच होय.

रांगोळीचा कणा पाडल्यावर त्यांत जसा शोभेल तसाच रंग भरण्याबद्दल सावधपणा ठेवावा.

रांगोळयासंबंधीं स्वतंत्र पुस्तकें हल्लीं प्रगट असल्यामुळें येथें अधिक विवेचन केलें नाहीं.

रांगोळी घालण्याच्या आकृति शेवटीं दिल्या आहेत.

प्रकरण ६ वें समाप्त.

# दिपवाळी रंजन.

## प्रकरण ७ वें.

## उपसंहार.

प्रिय वाचकहो, येथपर्यंत दिवाळीच्या सणाचें आह्मी यथामती वर्णन केलें आहे. आतां आमच्या आरंभींच्या लिहिण्याप्रमाणें हा सण पारमार्थिक, शारीरिक आणि लौकिक अशा तीन प्रकारांनीं उपयुक्त कसा आहे हें एक वेळ स्पष्ट सांगून मग तुमची रजा घेतों. मागील पांच भागांत वर्णन केल्यावरून दिवाळींत मुख्य मुख्य कृत्यें कोणतीं करावीं? असा प्रश्न उत्पन्न होतो, आणि तीं कृत्यें केल्यापासून तीन प्रकारची उपयुक्तता तीही कशी? असा एक दुसराही प्रश्न येणारच. तर दिवाळीचे दिवस जवळ आले, ह्मणजे आपापलीं घरेंदारें झाडून स्वच्छ करून त्यांस आपापलया आवडीप्रमाणें चुना किंवा पाहिजे तो रंग लावावा; धनतेरशीच्या दिवसा पासून चार पांच दिवस जिकडे तिकडे दिवे लावावे; अंगाला उटणीं व सुवासिक तेलें लाऊन उष्णोदकानें स्नानें करावीं; मिष्ट पक्वान्नें भक्षण करावीं, आणि दारू जाळावी. इतकीं कृत्यें मुख्य व आवश्यक अशीं आहेत आणि शिवाय मागें सांगितल्याप्रमाणें दानधर्मही आहेच. पहा बरें, आपले पूर्वज किती दूरदर्शी होते? आहाहा!! त्यांचें वर्णन करावें तितकें थोडेंच! आतां तुह्मी ह्मणाल, आह्माला तीन प्रकारचे फायदे दाखविणार

ोतां, ते कोठें दिसतच नाहींत. तर बाबानों, दिवाळींत ानधर्म करणें ही पारमार्थिक उपयुक्तता; अंगाला सुवा सिक तेलें व उटणीं लाऊन शरीर स्वच्छ करणें ही शारीरिक उपयुक्तता; यांतच चुना लावण्याचा फायदा आहे, तो असा कीं, पावसाळ्यांत पाऊस पडून घरें खराब होतात. तीं चुना लाऊन झाडून लखलखीत केल्यावर घरांतील हवा निरोगी होते; आणखी दारू जाळण्यापासून बाहेरील हवा स्वच्छ होते, हाही शारीरिक फायदाच आहे; आणि आपले आप्त सोयरे, मुलेंबाळें इत्यादिकांस जें देणें ( नवीं वस्त्रें अलंकार इत्यादि ) तें लौकिकी उपयुक्ततेंत येत असते. तर अशा तीन प्रकारांनीं दिवाळीचा सण उप आहे, असें जाणून व धर्मावर श्रद्धा ठेऊन प्रत्येक हिंदू आचारण करावा. तरच त्यास सर्व सुखाची अनुकूलता हो

हा निबंध सर्वस्वी निर्दोष झाला आहे, असें आ ह्मणणें नाहीं, यांत अनेक दोष असतील, अशी आम खात्री आहे, तरी विद्वज्जनांनीं यत्किंचित गुणाकडे ल देऊन या सणाबद्दल परधर्मी लोकांनीं जी निंदा केली अ तिचे खंडण करावें आणि याची उपयुक्तता प्रसिद्ध करा अशी आमची त्यांस करद्वय जोडून प्रार्थना आहे.

छापखान्यांतील अनेक अडचणी व जलद छापण्याची यामुळें पुस्तकांत जागजागीं शुद्धाशुद्धतेच्या चुका राहिल्या अ त्याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी.

समाप्त.